रजिस्ट्री सं. डी. 221 Price: Rs. 5.00
REGISTERED No. D-221
नोंदणी क्रमांक डी-221

# भारत का राजपत्र
# The Gazette of India
# भारताचे राजपत्र

असाधारण
EXTRAORDINARY
असाधारण
भाग 12 अनुभाग 1
Part XII Section 1
भाग बारा अनुभाग 1
प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY
प्राधिकाराद्वारे प्रकाशित

सं. 2] नई दिल्ली, 22 दिसम्बर 1997/1 पौष (शके) 1919 [खंड ८
No. 2] NEW DELHI, 22nd DECEMBER 1997/1 PAUSA (SAKA) 1919 [Vol. 8
अंक २] नवी दिल्ली, २२ डिसेंबर १९९७/१ पौष (शके) १९१९ [खंड ८

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## विधि और न्याय मंत्रालय

(विधायी विभाग)

नई दिल्ली, दिनांक 22 दिसम्बर 1997/1 पौष (शके) 1919

(1) दि मुस्लिम पर्सनल लॉ (शरीअत) ॲप्लिकेशन एक्ट, 1937, (2) दि स्मगलर्स अॅन्ड फॉरिन एक्सचेंज मॅनिप्युलेटर्स (फॉरफिचर ऑफ प्रॉपर्टी) एक्ट, 1976, (3) दि सेल्स प्रमोशन एम्प्लॉयीज् (कन्डिशन्स ऑफ सर्व्हिस) एक्ट, 1976, (4) दि स्मॉल इन्डस्ट्रीज् डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया एक्ट, 1989, (5) दि रेमिटन्सेस ऑफ फॉरिन एक्सचेंज अॅन्ड इनव्हेस्टमेंट इन फॉरिन एक्सचेंज बॉन्डस् (इम्युनिटिज् अॅन्ड एक्झम्पशन्स्) एक्ट, 1991, (6) दि प्लेसेस ऑफ वरशिप (स्पेशल प्रोव्हिजन्स) एक्ट, 1991, (7) दि प्रिव्हेन्शन ऑफ डॅमेजीस् ऑफ पब्लिक प्रॉपर्टी एक्ट, 1984 के मराठी अनुवाद राष्ट्रपती के प्राधिकार से प्रकाशित किये जाते है और ये प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, 1973 (1973 का 50) की धारा 2 के खण्ड (क) के अधीन उनके मराठी प्राधिकृत पाठ समझे जायेंगे ।

## MINISTRY OF LAW AND JUSTICE

(LEGISLATIVE DEPARTMENT)

New Delhi, dated 22nd December 1997/1 Pausa (Saka) 1919

The Translation in Marathi of (1) The Muslim Personal Law (Shariat) Application Act, 1937, (2) The Smugglers and Foreign Exchange Manipulators (Forfeiture of Property) Act, 1976, (3) The Sales Promotion Employees (Conditions of Service) Act, 1976, (4) The Small Industries Development Bank of India Act, 1989, (5) The Remittances of Foreign Exchange and Investment in Foreign Exchange Bonds (Immunities and Exemptions) Act, 1991, (6) The Places of Worship (Special Provisions) Act, 1991, (7) The Prevention of Damages of Public Property Act, 1984 are hereby published

under the authority of the President and shall be deemed to be the authoritative texts thereof in Marathi under clause (*a*) of Section 2 of the Authoritative Texts (Central Laws), Act, 1973 (50 of 1973).

**विधि व न्याय मंत्रालय**

(विधायी विभाग)

नवी दिल्ली, दिनांक २२ डिसेंबर १९९७/१ पौष (शके) १९१९

पुढील अधिनियमांचे म्हणजे (१) दि मुस्लिम पर्सनल लॉ (शरीअत) ॲप्लिकेशन् ॲक्ट, १९३७, (२) दि स्मगलर्स अन्ड फॉरिन एक्सचेंज मॅनिप्युलेटर्स (फॉरफिचर ऑफ प्रॉपर्टी) ॲक्ट, १९७६, (३) दि सेल्स प्रमोशन एम्प्लॉयीज (कन्डिशन्स ऑफ सर्व्हिस) ॲक्ट, १९७६, (४) दि स्मॉल इन्डस्ट्रीज डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया ॲक्ट, १९८९, (५) दि रेमिटन्सेस ऑफ फॉरिन एक्सचेंज अन्ड इनव्हेस्टमेंट इन फॉरिन एक्सचेंज बॉन्डस् (इम्युनिटिज् अॅन्ड एक्झम्पशन्स्) एक्ट, १९९१, (६) दि प्लेसेस ऑफ वरशिप (स्पेशल प्रोव्हिजन्स) ॲक्ट, १९९१, (७) दि प्रिव्हेन्शन ऑफ डॅमेजीस ऑफ पब्लिक प्रॉपर्टी ॲक्ट, १९८४ या अधिनियमांचे मराठी अनुवाद याद्वारे राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रसिद्ध करण्यात येत असून 'प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३' (१९७३ चा अधिनियम क्रमांक ५०) याच्या कलम २, खंड (क) अन्वये हे अनुवाद त्या अधिनियमाचे प्राधिकृत पाठ आहेत असे समजले जाईल.

**निर्देशसूची**

**INDEX**


| अनुक्रमांक<br>Serial No.<br>(१) | अधिनियमाचे नाव<br>Name of the Act<br>(२) | पृष्ठ क्रमांक<br>Page No.<br>(३) |
|---|---|---|
| १ | मुस्लिम व्यक्तिविषयक विधि (शरीअत) प्रयुक्ती अधिनियम, १९३७<br>The Muslim Personal Law (Shariat) Application Act, 1937 | ७० |
| २ | तस्कर आणि विदेशी विनिमय चलन कूटव्यवहारी (संपत्तीचे समपहरण) अधिनियम, १९७६<br>The Smugglers and Foreign Exchange Manipulators (Forfeiture of Property) Act, 1976 | ७२ |
| ३ | विक्री प्रवर्धन कामगार (सेवाशर्ती) अधिनियम, १९७६<br>The Sales Promotion Employees (Conditions of Service) Act, 1976 | ८२ |
| ४ | भारतीय लघु उद्योग विकास बँक अधिनियम, १९८९<br>The Small Industries Development Bank of India Act, 1989 | ८७ |
| ५ | परकीय चलनाचे वित्तप्रेषण व परकीय चलन रोख्यातील गुंतवणूक (उन्मुक्ती व सूट) अधिनियम, १९९१<br>The Remittances of Foreign Exchange and Investment in Foreign Exchange Bonds (Immunities and Exemptions) Act, 1991 | १०९ |
| ६ | उपासना स्थाने (विशेष उपबंध) अधिनियम, १९९१<br>The Places of Worship (Special Provisions) Act, 1991 | ११३ |
| ७ | सार्वजनिक संपत्तीस हानी प्रतिबंध अधिनियम, १९८४<br>The Prevention of Damages of Public Property Act, 1984 | ११५ |

# भारतीय लघु उद्योग विकास बँक अधिनियम, १९८९

**(१९८९ चा अधिनियम क्रमांक ३९)**

(१५ जून, १९९६ रोजी यथाविद्यमान)

[२५ ऑक्टोबर, १९८९]

लघु उद्योग क्षेत्रातील उद्योगधंदे प्रवर्धनासाठी, त्यांची वित्तव्यवस्था करण्यासाठी आणि त्यांच्या विकासासाठी प्रमुख वित्तीय संस्था म्हणून भारतीय लघु उद्योग विकास बँकेची स्थापना करण्याकरिता आणि लघु उद्योग क्षेत्रातील उद्योगधंदे प्रवर्धनाकरिता, त्यांची वित्तव्यवस्था करण्यासाठी आणि त्यांच्या विकासासाठी कार्यरत असणाऱ्या संस्थांच्या कार्याचा समन्वय साधण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा आनुषंगिक असलेल्या बाबींसाठी अधिनियम.

भारतीय गणराज्याच्या चाळीसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

प्रकरण एक

**प्रारंभिक**

१. (१) या अधिनियमास "भारतीय लघु उद्योग विकास बँक अधिनियम, १९८९" असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

(२) त्याचा विस्तार संपूर्ण भारतभर आहे.

(३) केंद्र शासन, अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकापासून तो अंमलात येईल आणि या अधिनियमाच्या निरनिराळ्या उपबंधांसाठी निरनिराळे दिनांक नियत करता येतील.

२. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,— व्याख्या.

(क) "मंडळ" याचा अर्थ, कलम ५ मध्ये उल्लेखिलेल्या भारतीय लघु उद्योग विकास बँकेचे संचालक मंडळ, असा आहे ;

(ख) "अध्यक्ष" याचा अर्थ, कलम ६ च्या पोटकलम (१) च्या खंड (क) मध्ये उल्लेखिलेला अध्यक्ष, असा आहे ;

(ग) "न्यायालय" याचा अर्थ ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये,—

(एक) प्रतिवादीचे किंवा उत्तरवादीचे, अथवा एकापेक्षा अधिक प्रतिवादी वा उत्तरवादी असतील अशा बाबतीत, त्यांच्यापैकी कोणाही एकाचे, त्याच्याविरुद्ध या अधिनियमाखाली कोणतीही वैध कार्यवाही सुरू करतेवेळी—

(१) नोंदणीकृत कार्यालय असेल, किंवा

(२) तो त्याचा संपूर्ण वा अंशतः व्यवसाय चालवित असेल, अथवा

(दोन) अशा वैध कार्यवाहीसाठी, संपूर्णतः किंवा अंशतः कोणतेही वादकारण उद्‌भवले असेल,

ते उच्च न्यायालय, असा आहे ;

(घ) "विकास बँक" याचा अर्थ, भारतीय औद्योगिक विकास बँक अधिनियम, १९६४ (१९६४ चा १८) कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेली भारतीय औद्योगिक विकास बँक, असा आहे ;

(ङ) "संचालक" याचा अर्थ, कलम ६ च्या पोटकलम (१) अन्वये नामनिर्देशित करण्यात आलेला संचालक, असा असून त्यामध्ये व्यवस्थापन संचालकाचा समावेश होतो ;

(च) "निर्यात" याचा अर्थ, लघु उद्योग क्षेत्रातील कोणत्याही औद्योगिक संस्थेच्या उत्पादित वस्तू वा सेवा यांची भारतामधून होणारी निर्यात, असा आहे ;

(छ) "आयात" याचा अर्थ, लघु उद्योग क्षेत्रातील कोणत्याही औद्योगिक संस्थेच्या वापरासाठी, सेवांची अथवा मालाची भारतात होणारी आयात, असा आहे, आणि मालात विक्रेय वस्तू आणि घन, द्रव किंवा वायू रूपातील सर्व सामग्री आणि सर्व प्रकारची ऊर्जा यांचा समावेश आहे ;

(ज) " लघु उद्योग क्षेत्रातील औद्योगिक संस्था " याचा अर्थ, भारतीय औद्योगिक विकास बँक अधिनियम, १९६४ (१९६४ चा १८) याच्या कलम २ च्या खंड (ग) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेली आणि उद्योग (विकास व विनियम) अधिनियम, १९५१ (१९५१ चा ६५) याच्या कलम ११ ख अन्वये लघु उद्योग उपक्रम म्हणून समजण्यात येणारी औद्योगिक संस्था, असा आहे ;

(झ) " व्यवस्थापन संचालक " याचा अर्थ, कलम ७ च्या पोटकलम (१) अन्वये नियुक्त करण्यात आलेला व्यवस्थापन संचालक, असा आहे ;

(ञ) " राष्ट्रीय लघु उद्योग निगम " याचा अर्थ, कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) अन्वये नोंदणी करण्यात आलेले राष्ट्रीय लघु उद्योग निगम मर्यादित, असा आहे ;

(ट) " अधिसूचना " याचा अर्थ, **शासकीय राजपत्रात** प्रकाशित झालेली अधिसूचना, असा आहे ;

(ठ) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या विनियमाद्वारे विहित, असा आहे ;

(ड) " लघु उद्योग बँक " याचा अर्थ, कलम ३ च्या पोटकलम (१) अन्वये स्थापन करण्यात आलेली भारतीय लघु उद्योग विकास बँक, असा आहे ;

(ढ) " राज्य लघु उद्योग निगम " याचा अर्थ, कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) अन्वये राज्यातील लघु उद्योगांसाठी नोंदणी करण्यात आलेला राज्य निगम, असा आहे ;

(ण) " राज्य वित्तीय निगम " याचा अर्थ, राज्य वित्तीय निगम अधिनियम, १९५१ (१९५१ चा ६३) याच्या कलम ३ किंवा कलम ३ क अन्वये स्थापन झालेली वित्तीय निगम अथवा कलम ४६ अन्वये अधिसूचित केलेली संस्था, असा आहे ;

(त) " राज्य औद्योगिक विकास निगम " याचा अर्थ, कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) अन्वये राज्यातील उद्योगांच्या विकासासाठी नोंदणी करण्यात आलेला राज्य निगम, असा आहे ;

(थ) या अधिनियमामध्ये वापरलेले आणि व्याख्या न केलेले, परंतु भारतीय औद्योगिक विकास बँक अधिनियम, १९६४ (१९६४ चा १८) यामध्ये व्याख्या केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना त्या अधिनियमात, अनुक्रमे नेमून दिलेले अर्थ असतील.

## प्रकरण दोन

## भारतीय लघु उद्योग विकास बँकेची स्थापना व तिचे भांडवल

भारतीय लघु उद्योग विकास बँकेची स्थापना व तिचे कायद्याने संस्थापन.

**३.** (१) केंद्र शासन, अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकापासून या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी भारतीय लघु उद्योग विकास बँक या नावाने ओळखल्या जाणाऱ्या निगमांची स्थापना करण्यात येईल.

(२) लघु उद्योग बँक म्हणजे, शाश्वत परंपरा आणि सामान्य मुद्रा असलेला या अधिनियमाच्या उपबंधांच्या अधीनतेने, सपंत्ती संपादित करण्याची, धारण करण्याची आणि तिची विल्हेवाट लावण्याची, संविदा करण्याची शक्ती असलेला, पूर्वोक्त नावाचा निगम-निकाय असेल आणि त्या नावाने त्या बँकेला किंवा तिच्यावर दावा लावता येईल.

(३) लघु उद्योग बँकेचे मुख्य कार्यालय लखनौ येथे किंवा केंद्र शासन अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा अन्य ठिकाणी असेल.

(४) लघु उद्योग बँक भारतात किंवा भारताबाहेर कोणत्याही ठिकाणी कार्यालये, शाखा किंवा एजन्सी स्थापन करील.

प्राधिकृत भांडवल.

**४.** (१) लघु उद्योग बँकेचे प्रधिकृत भांडवल दोनशे पन्नास कोटी रुपये इतके असेल :

परंतु, विकास बँकेला उक्त भांडवल एक हजार कोटी रुपयांपर्यंत वाढवता येईल.

(२) लघु उद्योग बँकेच्या विक्रीस काढलेल्या भांडवलास पूर्णपणे विकास बँक अभिदान देईल.

## प्रकरण तीन

## लघु उद्योग बँकेचे व्यवस्थापन

व्यवस्थापन.

**५.** (१) लघु उद्योग बँकेचे व्यवहार व कामकाज यांचे सर्वसाधारण अधीक्षण, संचालन व व्यवस्थापन संचालक मंडळाकडे निहित असेल आणि त्या मंडळाला लघु उद्योग बँकेकडून वापरल्या जाणाऱ्या सर्व शक्तींचा वापर करता येईल आणि केल्या जाणाऱ्या कृती करता येतील.

(२) या अधिनियमाखालील तिची कार्ये पार पाडतेवेळी लोकहित अंतर्भूत असलेल्या धोरणविषयक बाबींसंबंधात लघु उद्योग बँकेला केंद्र शासन, विकास बँकेशी विचारविनिमय केल्यानंतर किंवा विकास बँक लेखी देईल अशा निदेशांद्वारे, मार्गदर्शन केले जाईल.

(३) या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या विनियमांमध्ये अन्यथा उपबंधित केले असेल ते खेरीजकरुन अन्यथा, अध्यक्षालाही लघु उद्योग बँकेचे व्यवहार व कामकाज यांचे सर्वसाधारण अधीक्षण व निदेशन या संबंधातील शक्ती असतील आणि त्या बँकेकडून वापरण्यात येतील अशा सर्व शक्तींचा त्यालाही वापर करता येईल आणि करण्यात येतील अशा सर्व कृती आणि गोष्टी करता येतील.

(४) या अधिनियमाच्या उपबंधांच्या अधीनतेने, मंडळ आपली कार्ये पार पाडतेवेळी, लोकहिताकडे यथोचित लक्ष देऊन व्यवसायाच्या तत्त्वांनुसार कृती करील.

मंडळाची रचना.

६. (१) मंडळामध्ये खालील व्यक्तींचा समावेश असेल, त्या अशा :—

(क) विकास बँकेचा अध्यक्ष तो पूर्ण वेळ अध्यक्ष असल्यास, आणि तो पूर्ण वेळ अध्यक्ष नसल्यास, त्या बँकेचा व्यवस्थापन संचालक, लघु उद्योग बँकेचा पदसिद्ध अध्यक्ष असेल ;

(ख) केंद्र शासनाने त्याच्या अधिकाऱ्यांमधून नामनिर्देशित करावयाचे दोन संचालक ;

(ग) कार्यकारी संचालक किंवा त्यापेक्षा वरच्या दर्जाच्या आपल्या अधिकाऱ्यांमधून रिझर्व्ह बँकेने नामनिर्देशित करावयाचा एक संचालक ;

(घ) विकास बँकेने नामनिर्देशित करावयाचे दहा संचालक, त्यांपैकी—

(एक) एक तिच्या अधिकाऱ्यांपैकी असेल ;

(दोन) एक राष्ट्रीय कृषि व ग्रामीण विकास अधिनियम, १९८१ याच्या कलम ३ अन्वये स्थापन झालेल्या राष्ट्रीय कृषि व ग्रामीण विकास बँकेचा प्रतिनिधी असेल ;

(तीन) एक खादी व ग्रामोद्योग आयोग अधिनियम, १९५६ याच्या कलम ४ अन्वये स्थापन झालेल्या खादी व ग्रामोद्योग आयोगाचा प्रतिनिधी असेल ;

(चार) लघु उद्योग क्षेत्र किंवा सहकारी क्षेत्र यांतील उद्योग तज्ज्ञ अथवा विकास बँकेच्या मते, लघु उद्योग बँकेसाठी इष्ट किंवा उपयोगी ठरेल असे विशेष ज्ञान किंवा व्यावसायिक अनुभव असलेल्या व्यक्ती अथवा अनुसूचित बँका, राज्य वित्तीय निगम, राज्य लघु उद्योग निगम किंवा राष्ट्रीय लघु उद्योग महामंडळ यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या व्यक्ती, यांच्यापैकी सात व्यक्ती असतील ;

(ङ) व्यवस्थापन संचालक, पदसिद्ध संचालक.

(२) खंड (ख), खंड (ग) किंवा खंड (घ) चा उपखंड (एक) मध्ये निर्देशिलेला प्रत्येक संचालक त्याला नामनिर्देशित करणाऱ्या प्राधिकरणाची मर्जी असेल तोपर्यंत पद धारण करील.

(३) पोटकलम (२) मध्ये निर्देशिलेल्या खेरीज अन्य प्रत्येक संचालक, विकास बँक या संबंधात विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे तीन वर्षांहून अधिक नसेल अशा कालावधीसाठी पद धारण करील आणि तो पुनर्नियुक्तीसाठी पात्र असेल :

परंतु, असा कोणताही संचालक सलगपणे सहा वर्षांपेक्षा अधिक काळापर्यंत पद धारण करणार नाही.

(४) मंडळाच्या किंवा त्याच्या कोणत्याही समितीच्या बैठकींना उपस्थित राहण्याबद्दल आणि लघु उद्योग बँकेच्या इतर कोणत्याही कामाकडे लक्ष पुरवण्याबद्दल, संचालकांना, विहित करण्यात येईल अशी फी व भत्ते देण्यात येतील.

७. (१) विकास बँक, लघु उद्योग बँकेच्या व्यवस्थापन संचालकांची नियुक्ती करील व तो बँकेचा पूर्ण वेळ मुख्य कार्यकारी अधिकारी असेल. व्यवस्थापन संचालक.

(२) कलम ५ च्या उपबंधाच्या अधीनतेने आणि या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या विनियमांमध्ये अन्यथा उपबंधित केले असेल ते खेरीजकरून, इतर बाबतीत लघु उद्योग बँकेचे व्यवहार व कामकाज यांचे सर्वसाधारण अधीक्षण, संचालन व व्यवस्थापन या संबंधातील शक्ती व्यवस्थापन संचालकाकडे निहित असतील आणि मंडळ किंवा अध्यक्ष यांच्याकडून त्याला प्रत्यायोजित करण्यात येतील अशा शक्तींचा तो वापर करील आणि अशी कर्तव्ये पार पाडील.

(३) व्यवस्थापन संचालक, या अधिनियमाखालील त्याच्या शक्तींचा वापर करतेवेळी आणि कर्तव्ये पार पाडीत असताना, मंडळ किंवा अध्यक्ष देईल अशा निदेशांचे अनुपालन करील.

(४) व्यवस्थापन संचालकाचे वेतन, भत्ते व इतर सेवा शर्ती, व्यवस्थापन बँकेकडून निर्धारित करण्यात येतील त्यानुसार असतील.

(५) विकास बँक यासंबंधात विनिर्दिष्ट करील अशा पाच वर्षापेक्षा अधिक नसलेल्या कालावधीसाठी व्यवस्थापन संचालक पद धारण करील आणि तो पुनर्नियुक्तीस पात्र असेल.

(६) विकास बँक, व्यवस्थापन संचालकाला, प्रस्तावित बडतर्फीविरुद्ध कारण दाखवण्याची वाजवी संधी दिल्यानंतर कोणत्याही वेळी, त्याला बडतर्फ करू शकेल.

(७) पोटकलम (५) व (६) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, व्यवस्थापन संचालकाला तीन महिन्यांपेक्षा कमी नसेल अशा कालावधीची लेखी नोटीस किंवा त्याऐवजी तीन महिन्यांचे वेतन व भत्ते देऊन कोणत्याही वेळी त्याचा पदावधी समापित करण्याचा विकास बँकेला अधिकार असेल आणि विकास बँकेला तीन महिन्यांपेक्षा कमी नसेल अशा कालावधीची लेखी नोटीस देऊन, कोणत्याही वेळी आपले पद सोडून देण्याचा व्यवस्थापन संचालकालाही अधिकार असेल.

निरर्हता.

**८.** कोणतीही व्यक्ती जर,—

(क्) विकल मनाची असेल किंवा झाली अथवा सक्षम न्यायालयाकडून ती अशी असल्याचे घोषित करण्यात आले तर, अथवा

(ख्) विकास बँकेच्या मते, ज्यामध्ये नैतिक अध:पात होतो अशा कोणत्याही अपराधाबद्दल सिद्धदोष ठरविण्यात येईल किंवा आली असेल तर, अथवा

(ग्) नादार म्हणून अभिनिर्नित करण्यात येईल किंवा कोणत्याही वेळी करण्यात आलेली असेल अथवा तिची ऋणे चुकती करण्याचे तिने निलंबित केलेले असेल किंवा तिच्या धनकोंची तिने आपसाती केली असेल तर,

ती संचालक होऊ शकणार नाही.

संचालकाकडून पदरिक्तता किंवा पदाचा राजीनामा.

**९.** (१) जर कोणताही संचालक—

(क्) कलम ८ मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही निरर्हतांच्या अधीन होईल, किंवा

(ख्) मंडळाच्या पाठोपाठच्या तीन किंवा अधिक बैठकांना त्याच्या परवानगीशिवाय अनुपस्थित असेल तर, तद्नंतर त्याची जागा रिक्त होईल.

(२) कोणत्याही संचालकाला, त्याला नामनिर्देशित करणाऱ्या प्राधिकरणाला तशी लेखी नोटीस देऊन त्याच्या पदाचा राजीनामा देता येईल आणि अशा प्राधिकरणाकडून त्याचा राजीनामा स्वीकारण्यात आला नाही तर अशा नामनिर्देशन अधिकाऱ्याला तो मिळाल्यापासून तीन महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर त्याने त्याचे पद रिक्त केले असल्याचे समजण्यात येईल.

व्यवस्थापन संचालकाच्या पदाच्या नैमित्तिक रिक्तता.

**१०.** व्यवस्थापन संचालक, विकलतेमुळे वा अन्यथा, त्याची कर्तव्ये पार पाडण्यास असमर्थ झाला असेल अथवा त्याचे पद रिकामे होणार नाही अशा परिस्थितीतील रजेमुळे किंवा अन्यथा अनुपस्थित असेल तर विकास बँकेला, त्याच्या अनुपस्थितीच्या कालावधीत त्याच्या जागी काम चालविण्यासाठी अन्य व्यक्तीची नियुक्ती करता येईल.

मंडळाच्या बैठकी.

**११.** (१) विहित करण्यात येईल अशा वेळी आणि अशा ठिकाणी मंडळाची बैठक होईल आणि बैठकींमधील कामकाज चालवण्यासंबंधात विहित करण्यात येतील अशा कार्यपद्धती नियमांचे पालन करण्यात येईल.

(२) अध्यक्ष किंवा त्यास कोणत्याही कारणास्तव बैठकीस उपस्थित राहणे अशक्य असल्यास, यासंबंधात अध्यक्षांकडून नामनिर्देशित करण्यात आलेला कोणताही संचालक आणि अशा नामनिर्देशनाच्या अभावी, बैठकीच्या वेळी उपस्थित असलेल्या संचालकांनी त्यांच्यातूनच निवडून दिलेला अन्य कोणताही संचालक, बैठकीच्या अध्यक्षस्थानी असेल.

(३) मंडळाच्या कोणत्याही बैठकीपुढे येणाऱ्या सर्व प्रश्नांवार उपस्थित असणाऱ्या आणि मतदान करणाऱ्या संचालकांच्या बहुमतानुसार निर्णय घेतला जाईल आणि मत संख्या समान असेल तर, अध्यक्ष अथवा त्यांच्या अनुपस्थितीत, अध्यक्षपदी असणाऱ्या व्यक्तीला दुसरे मत किंवा निर्णायक मत असेल.

१२. (१) मंडळाला, त्यास योग्य वाटतील अशा प्रयोजनांसाठी, संपूर्णपणे संचालकांचा किंवा संपूर्णपणे इतर व्यक्तींचा किंवा अंशतः संचालकांचा किंवा अंशतः इतर व्यक्तींचा समावेश असलेल्या अशा समित्या स्थापन करता येतील. समित्या.

(२) पोटकलम (१) अन्वये स्थापन करण्यात आलेल्या कोणत्याही समितीच्या बैठकीनी उपस्थित राहण्यासाठी आणि लघु उद्योग बँकेच्या अन्य कोणत्याही कामाकडे लक्ष पुरविण्यासाठी मंडळाकडून निर्धारित करण्यात येईल अशी फी व भत्ते समितीच्या सदस्यांना देण्यात येतील.

## प्रकरण चार

## लघु उद्योग बँकेचे कामकाज

१३. (१) लघु उद्योग बँक, लघु उद्योग क्षेत्रातील औद्योगिक संस्थांचे प्रचालन, वित्तव्यवस्था व विकास यासाठी प्रमुख वित्तव्यवस्था संस्था म्हणून कार्य करील आणि ती लघु उद्योग क्षेत्रातील औद्योगिक संस्थांचे प्रचालन, वित्तव्यवस्था व विकास यांसाठी काम करणाऱ्या संस्थांच्या कार्याचे समन्वयनही करील आणि तिला खालीलपैकी कोणतेही काम चालू ठेवता येईल, ते असे :— लघु उद्योग बँकेचे कामकाज.

(एक) कोणताही राज्य वित्तीय निगम, राज्य औद्योगिक विकास निगम, राज्य लघु उद्योग विकास निगम, अनुसूचित बँक, राज्य सहकारी बँक किंवा केंद्र शासन, विकास बँकेच्या शिफारशीवरून विनिर्दिष्ट करील अशा अन्य वित्तीय संस्था यांना, तिला लादणे योग्य वाटतील अशा अटी व शर्ती यांच्या अधीनतेने, लघु उद्योग क्षेत्रातील औद्योगिक संस्थांना, असे निगम, बँक किंवा संस्था यांच्याकडून देण्यात आलेल्या कर्जाची किंवा अग्रिमांची, पुनर्वितव्यवस्था म्हणून पंचवीस वर्षांपेक्षा अधिक नसेल अशा कालावधीत परतफेडयोग्य असलेली कर्जे व अग्रिमे देणे ;

(दोन) लघु उद्योग क्षेत्रातील औद्योगिक विकास संस्थांकडून किंवा लघु उद्योग क्षेत्रातील औद्योगिक संस्थेने निर्मिलेला माल विकणाऱ्या कोणत्याही व्यक्तीकडून करण्यात आलेली, काढलेली, स्वीकारलेली किंवा पृष्ठांकित केलेली कोणतीही विनिमयपत्रे व वचनचिठ्ठ्या स्वीकारणे, बट्ट्याने वटवणे किंवा पुन्हा बट्ट्याने वटवणे ;

(तीन) कोणताही राज्य वित्तीय निगम, राज्य औद्योगिक विकास निगम, राज्य लघु उद्योग निगम, राष्ट्रीय लघु उद्योग निगम किंवा केंद्र शासन विकास बँकेच्या शिफारशीवरून विनिर्दिष्ट करील अशा अन्य कोणत्याही वित्तीय संस्था यांचे रोखे, शेअर्स, बंधपत्रे किंवा ऋणपत्रे यांसाठी अभिदान करणे किंवा ती खरेदी करणे ;

(चार) कोणताही राज्य वित्तीय निगम, राज्य औद्योगिक विकास निगम, राज्य लघु उद्योग निगम, राष्ट्रीय लघु उद्योग निगम किंवा केंद्र शासन विकास बँकेच्या शिफारशींवरून विनिर्दिष्ट करील अशा अन्य कोणत्याही वित्तीय संस्था यांची पतकर्जाची किंवा कर्जे व अग्रिमे यांची मर्यादा मंजूर करणे ;

(पाच) लघु उद्योग क्षेत्रातील कोणत्याही औद्योगिक संस्थेला कर्जे व अग्रिमे मंजूर करणे अथवा अशा कोणत्याही संस्थेचे रोखे, शेअर्स, बंधपत्रे किंवा ऋणपत्रे यांसाठी अभिदान करणे किंवा ती खरेदी करणे वा विक्रीस काढण्याची हमी घेणे :

परंतु, या खंडात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट, लघु उद्योग क्षेत्रातील औद्योगिक संस्थेला कर्जे व अग्रिमे देण्याच्या अथवा तिच्या ऋणपत्रांसाठी अभिदान करण्याच्या बाबतीत लघु उद्योग बँकेला प्रतिबंध करते असे समजले जाणार नाही. त्यावरील अदत्त रकमा लघुउद्योग बँकेच्या विकल्पानुसार कर्ज, अग्रिम वा ऋणपत्र परतफेड योग्य होण्याच्या कालावधीत त्या संस्थेच्या रोख्यामध्ये किंवा शेअर्समध्ये परिवर्तनीय होतील.

**स्पष्टीकरण.**—या खंडात, कोणतेही कर्ज किंवा अग्रिम यासंबंधात वापरलेल्या " त्यावरील अदत्त रकमा " अशा शब्दप्रयोगाचा अर्थ, मुद्दल, व्याज आणि रकमांचे रोख्यांमध्ये किंवा शेअर्समध्ये परिवर्तन करावयाचे असेल त्यावेळी असे कर्ज किंवा अग्रिम यावर प्रदेय असलेले इतर आकार, असा असेल.

(सहा) (क) निर्यात करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला, किंवा

(ख) निर्यातीच्या संबंधात भारताबाहेरील कोणत्याही व्यक्तीला,

(ग) लघु उद्योग क्षेत्रातील कोणत्याही औद्योगिक संस्थेने भारताबाहेर "परिपूर्ण प्रकल्प" कार्यान्वित करण्यासाठी,

कर्जे व अग्रिमे देणे.

(सात) अनुसूचित बँकेला किंवा कोणत्याही अन्य बँकेला किंवा विकास बँकेच्या शिफारशीवरून केंद्र शासन विनिर्दिष्ट करील अशा वित्तीय संस्थेला, त्यांनी निर्यातीच्या प्रयोजनांसाठी दिलेली कर्जे व अग्रिमे यांची पुनर्वित्तव्यवस्था म्हणून कर्जे व अग्रिमे मंजूर करणे ;

(आठ) निर्यात किंवा आयात यांच्याशी संबंधित व्यवहारांमधून उद्‌भवणारी विनिमयपत्रे किंवा वचनचिठ्ठ्या, भारतात किंवा भारताबाहेर स्वीकारणे, वसूल करणे, बट्ट्याने वटवणे, पुन्हा बट्ट्याने वटवणे, खरेदी करणे, त्यांची विक्री करणे किंवा **बेचन करणे** आणि अशी विनिमयपत्रे किंवा वचनचिठ्ठ्या यांच्या आधारावर भारतात किंवा भारताबाहेर कर्जे व अग्रिमे देणे ;

(नऊ) पतपत्रे मंजूर करणे, सुरू करणे, विक्रीस काढणे, पुष्टी देणे किंवा पृष्ठांकित करणे आणि त्याअन्वये काढण्यात आलेली विनिमयपत्रे किंवा इतर दस्तऐवज यांचे **बेचन करणे** किंवा ती वसूल करणे ;

(दहा) निर्यात किंवा आयात यांसाठी कोणत्याही परकीय राष्ट्राचे शासन अथवा भारताबाहेरील कोणतीही वित्तीय संस्था वा व्यक्ती यांना पतमर्यादा मंजूर करणे ;

(अकरा) लघु उद्योग क्षेत्रातील कोणत्याही औद्योगिक संस्थेकडून किंवा संस्थेसाठी वाहने, बोटी आणि विमाने यांसह यंत्रसामग्री, साधनसामग्री किंवा इतर मत्ता यांची भाडेपट्ट्याने किंवा पोट-भाडेपट्ट्याने भाडे खरेदी तत्त्वावर भारतातून करण्यात येणारी निर्यात वा भारतात करण्यात येणारी आयात, यांसाठी वित्तव्यवस्था करणे ;

(बारा) लघु उद्योग बँकेची कार्ये पार पाडण्यासाठी आवश्यक असेल असे परकीय चलन विकत घेणे वा विकणे अथवा परकीय चलनासंबंधातील अन्य व्यवहार करणे ;

(तेरा) भारतातील किंवा भारताबाहेरील कोणत्याही बँकेत कोणतेही खाते उघडणे अथवा भारतातील किंवा भारताबाहेरील कोणत्याही बँकेशी वा इतर संस्थेशी कोणतीही एजन्सी व्यवस्था करणे किंवा तिचा एजंट या प्रतिव्यवहारी म्हणून काम करणे ;

(चौदा) लघु उद्योग क्षेत्रातील कोणत्याही औद्योगिक संस्थेला लघु उद्योग बँकेने दिलेली कोणतीही कर्जे व अग्रिमे यासंबंधातील कोणताही संलेख, मोबदला घेऊन हस्तांतरित करणे ;

(पंधरा) लघु उद्योग क्षेत्रातील कोणत्याही औद्योगिक संस्थेतील गुंतवणुकीच्या प्रयोजनार्थ, कोणत्याही व्यक्तीला कर्जे व अग्रिमे मंजूर करणे ;

(सोळा) लघु उद्योग क्षेत्रातील औद्योगिक संस्थेने केंद्र शासनाच्या संमतीने कोणतीही बँक, वित्तीय संस्था किंवा भारताबाहेरील कोणत्याही देशातील कोणतीही इतर सावकारी एजन्सी यांच्याकडून उभारलेली परकीय चलनातील कर्जे किंवा त्यांच्याशी केलेली परकीय चलनातील पतव्यवस्था याबाबत हमी देणे ;

(सतरा) लघु उद्योग क्षेत्रातील कोणत्याही औद्योगिक संस्थेकडून येणे असलेल्या स्थगित प्रदानांची हमी देणे ;

(अठरा) (क) लघु उद्योग क्षेत्रातील औद्योगिक संस्थांनी सार्वजनिक बाजारात उभारलेल्या कर्जाची, किंवा ;

(ख) लघु उद्योग क्षेत्रातील कोणत्याही औद्योगिक संस्थेने कोणतीही अनुसूचित बँक किंवा राज्य सहकारी बँक किंवा राज्य वित्तीय निगम किंवा राज्य औद्योगिक निगम किंवा केंद्र शासन, विकास बँकेच्या शिफारशीवरून विनिर्दिष्ट करील अशा अन्य वित्तीय संस्था यांच्याकडून उभारण्यात आलेल्या कर्जांची

हमी देणे ;

(एकोणीस) कोणताही अनुसूचित बँक किंवा राज्य सहकारी बँक किंवा राज्य वित्तीय निगम किंवा राज्य औद्योगिक विकास निगम किंवा राज्य लघु उद्योग निगम किंवा केंद्र शासन, विकास बँकेच्या शिफारशीवरून विनिर्दिष्ट करील अशा अन्य वित्तीय संस्था यांच्या, लघु उद्योग क्षेत्रातील कोणत्याही औद्योगिक संस्थेचे रोखे, शेअर्स, बंधपत्रे किंवा ऋणपत्रे यांच्या विक्रीची हमी घेण्यातून किंवा त्या संबंधात उद्‌भवलेल्या दायित्वाबाबत हमी देणे ;

(वीस) लघु उद्योग क्षेत्रातील कोणत्याही औद्योगिक संस्थेला दलाली सेवा पुरवणे ;

(एकवीस) तांत्रिक व वित्तीय सल्लामसलत, वाणिज्यिक बँक व्यवसाय व विस्तार सेवा पुरवणे ;

(बावीस) लघु उद्योग क्षेत्रातील उद्योगाच्या प्रचालनासाठी उद्योजक विकास कार्यक्रम, कच्चा माल खरेदी, विपणन सहाय्य आणि अशा कार्यात गुंतलेल्या एजन्सीचे प्रचालन किंवा त्यांना वित्तीय पाठबळ देणे यांसह इतर कार्ये हाती घेणे ;

(तेवीस) विकास बँकेच्या शिफारशीवरून केंद्र शासनाच्या मान्यतेने भारतातील लघु उद्योग क्षेत्रातील उद्योगाचे प्रचालन व विकास यासाठी वित्तीय सहाय्य देणे हा मुख्य उद्देश असलेल्या कोणत्याही संस्थेचा धंदा, मत्ता व दायित्वे यांसह उपक्रमाचे संपादन करणे ;

(चोवीस) लघु उद्योग क्षेत्रातील कोणत्याही औद्योगिक संस्थेला कोणतीही जंगम वा स्थावर मत्ता भाडेपट्ट्याने, पोट-भाडेपट्ट्याने किंवा भाड्याने वा भाडे-खरेदी तत्त्वावर देणे ;

(पंचवीस) मूल्यमापनासाठी किंवा पणन वा गुंतवणुका यांच्या व्यवहारासाठी संशोधन व सर्वेक्षण हाती घेणे आणि लघु उद्योग क्षेत्रातील उद्योगाच्या विकासाच्या संबंधात तांत्रिक, आर्थिक अभ्यास हाती घेणे व चालू ठेवणे ;

(सव्वीस) लघु उद्योग क्षेत्रातील कोणत्याही औद्योगिक संस्थेचे प्रचालन, व्यवस्थापन किंवा विस्तार यासाठी लघु उद्योग क्षेत्रातील कोणत्याही औद्योगिक संस्थेला वा कोणत्याही व्यक्तीला तांत्रिक, कायदेविषयक, पणनविषयक व प्रशासनिक सहाय्य देणे ;

(सत्तावीस) लघु उद्योग क्षेत्रातील उद्योगधंद्यांचे नियोजन, प्रचालन व विकास करणे ;

(अठ्ठावीस) कंपन्या, दुय्यम कंपन्या, सोसायट्या, न्यास किंवा तिला योग्य वाटेल अशा व्यक्तींचा अन्य अधिसंघ यांचे प्रचालन, घडण करणे अथवा त्या चालवणे किंवा त्यांचे प्रचालन, घडण किंवा चालन यामध्ये सहभागी होणे ;

(एकोणतीस) (क्) केंद्र शासन किंवा रिझर्व्ह बँक किंवा विकास बँक यांचा ; अथवा

(ख्) विकास बँक प्राधिकृत करील अशा अन्य शासनाचा व व्यक्तीचा एजंट म्हणून काम करणे ;

(तीस) केंद्र शासन , विकास बँकेच्या शिफारशीवरून प्राधिकृत करील अशा अन्य कोणत्याही प्रकारचा धंदा करणे ;

(एकतीस) आपल्या कोणत्याही मत्तेची विक्री किंवा हस्तांतरण करणे यांसह या अधिनियमाखालील किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याखालील शक्तींचा वापर करताना किंवा कर्तव्य पार पाडीत असताना, सर्वसाधारणतः तदनुषंगिक किंवा परिणामरूप अशा इतर कृती किंवा गोष्टी करणे ;

(२) लघु उद्योग बँकेला पोटकलम (६) मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही सेवांच्या प्रतिफलार्थ, संमत करण्यात येईल, असे कमिशन, दलाली, व्याज, पारिश्रमिक किंवा फी घेता येईल.

(३) लघु उद्योग बँक आपल्या स्वतःच्या बंधपत्रांच्या किंवा ऋणपत्रांच्या प्रतिभुतीवर कोणतेही कर्ज, किंवा अग्रिम देणार नाही किंवा इतर वित्तीय व्यवस्था करणार नाही.

केंद्र शासनाकडून कर्ज.

**१४.** केंद्र शासन, संसदेकडून यासंबंधातील कायद्याद्वारे करण्यात आलेल्या यथोचित विनियोजनानंतर लघु उद्योग बँकेला,

(क्) केंद्र शासनाकडून निर्धारित करण्यात येईल तेवढ्या रकमेचे, तशा हप्त्यांमध्ये आणि तशा रीतीने परतफेडयोग्ऽय असलेले विनव्याजी कर्ज, आणि

(ख्) संमत करण्यात येतील अशा अटी व शर्ती यानुसार कर्ज म्हणून अशा आणखी रकमा देऊ शकेल :

परंतु, केंद्र शासनाला लघु उद्योग बँकेने त्यास विनंती केल्यानंतर हप्त्यांची संख्या वाढवता येईल किंवा कोणत्याही हप्त्याची रक्कम बदलता येईल किंवा कोणताही हप्ता खंड (क्) अन्वये ज्या दिनांकास प्रदेय असेल तो दिनांक बदलता येईल.

लघु उद्योग बँकेने पैसे उसने घेणे आणि ठेवी स्वीकारणे.

**१५.** (१) लघु उद्योग बँकेला या अधिनियमाखालील तिची कार्ये पार पाडण्याच्या प्रयोजनार्थ,---

(क्) केंद्र शासनाच्या हमीसह किंवा हमीविना बंधपत्रे व ऋणपत्रे काढता येतील व विकता येतील ;

(ख्) (एक) मागणी होताच परतफेडयोग्य असलेला किंवा भारतात त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे विश्वस्ताला ज्यामध्ये न्यासाच्या पैशाची गुंतवणूक करण्यास अधिकृत करण्यात आले असेल असे रोखे, निधी व प्रतिभूती (स्थावर संपत्तिव्यतिरिक्त) याच्या तारणाच्या आधारावर ज्या दिनांकास पैसा उधार घेतलेला असेल त्या दिनांकापासून कमाल नव्वद दिवसांचा नियत कालावधी संपल्यानंतर परतफेडयोग्य असलेला पैसा,

(दोन) खरोखरीच्या वाणिज्यिक किंवा व्यापारी व्यवहारांमधून उद्‌भवलेली, दोन किंवा अधिक सुयोग्य स्वाक्षऱ्या असणारी आणि उसने घेतल्याच्या दिनांकापासून पाच वर्षांत परिणत होणारी विनिमयपत्रे किंवा वचनचिठ्ठ्या यांच्या आधारावर, पैसा

(तीन) भारतीय रिझर्व्ह बँक अधिनियम, १९३४ (१९३४ चा ४) याच्या कलम ४६ग अन्वये स्थापन करण्यात आलेल्या औद्योगिक पत (दीर्घकालीन व्यवहार) निधीतून या कलमात विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी, पैसा

----रिझर्व्ह बँकेकडून उसना घेता येईल ;

(ग्) विकास बँकेकडून किंवा विकास बँक सर्वसाधारणतः किंवा विशेषतः मान्यता देईल असे इतर प्राधिकरण, संघटना किंवा संस्था यांच्याकडून पैसा उसना घेता येईल ;

(घ्) विकास बँक, सर्वसाधारणतः किंवा विशेषतः मान्यता देईल, असा कालावधी संपल्यानंतर आणि अशा अटींवर परतफेडीयोग्य असलेल्या ठेवी स्वीकारता येतील.

(२) केंद्र शासनाला, लघु उद्योग बँकेने त्याला केलेल्या विनंतीवरून मुद्दलाची परतफेड करणे व त्या शासनाकडून निश्चित करण्यात येतील अशा दरांनी व्याज देणे यासाठी, त्या बँकेने विक्रीसाठी काढलेली बंधपत्रे व ऋणपत्रे याबाबत हमी देता येईल.

गुंतवणूक.

**१६.** लघु उद्योग बँकेला, आपला निधी केंद्र शासनाच्या किंवा कोणत्याही राज्य शासनाच्या प्रतिभूतिमध्ये अथवा कोणत्याही अनुसूचित बँकेकडील ठेवींमध्ये गुंतवता येईल.

अधिकार हस्तांतरित करण्याची शक्ती.

**१७.** लघु उद्योग बँकेने दिलेले कोणतेही कर्ज किंवा अग्रिम यांच्या संबंधातील तिचे अधिकार व हितसंबंध (त्यांना आनुषंगिक अशा कोणत्याही इतर अधिकारांसह) अथवा तिने वसूल करण्यायोग्य असलेली कोणतीही रक्कम, लघु उद्योग बँकेला, कोणताही संलेख निष्पादित करून वा पुरःसृत करून अथवा पृष्ठांकनांद्वारे कोणताही संलेख हस्तांतरित करून किंवा असे कर्ज वा अग्रिम यासंबंधातील अधिकार व हितसंबंध ज्या रीतीने कायदेशीररीत्या हस्तांतरित करता येत असतील अशा इतर कोणत्याही रीतीने, संपूर्णतः व अंशतः हस्तांतरित करता येतील आणि लघु उद्योग बँकेला, असे हस्तांतरण झाले असले तरीही हस्तांतरितीचा विश्वस्त म्हणून कृती करता येईल.

अधिकार संपादन करण्याची शक्ती.

**१८.** लघु उद्योग बँकेला, कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) याच्या कलम ४क मध्ये व्याख्या करण्यात आलेल्या कोणत्याही सरकारी वित्तीय संस्थेने दिलेले कोणतेही कर्ज किंवा अग्रिम अथवा तिने वसूल करण्यायोग्य कोणतीही रक्कम यासंबंधातील अशा संस्थेचे अधिकार व हितसंबंध (त्यांना आनुषंगिक अशा इतर कोणत्याही अधिकारांसह) कोणताही संलेख निष्पादित करून किंवा पुरःसृत करून अथवा कोणताही संलेख हस्तांतरित करून वा अन्य कोणत्याही रीतीने, एकतर पूर्णतः किंवा अंशतः हस्तांतरणाद्वारे अथवा अभिहस्तांतरणाद्वारे, संपादन करण्याचा अधिकार असेल.

विदेशी चलनातील कर्ज.

**१९.** (१) विदेशी चलन विनियमन अधिनियम, १९७३ (१९७३ चा ४६) यात किंवा विदेशी चलनासंबंधात त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही अधिनियमितीमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, लघु उद्योग बँक, या अधिनियमान्वये कर्जे व अग्रिमे देण्याच्या प्रयोजनार्थ, केंद्र शासन व विकास बँक यांच्या पूर्वसंमतीने, कोणत्याही परकीय देशातील कोणत्याही बँकेकडून किंवा वित्तीय संस्थेकडून किंवा अन्यथा विदेशी चलन उसने घेऊ शकेल.

(२) केंद्र शासनाला, आवश्यक तेथे, लघु उद्योग बँकेने पोटकलम (१) अन्वये घेतलेले कोणतेही कर्ज किंवा त्याचा कोणताही भाग यासंबंधात मुद्दलाची परतफेड आणि व्याज व इतर आनुषंगिक आकार यांचा भरणा करण्याची हमी देता येईल.

(३) पोटकलम (१) अन्वये उसन्या घेतलेल्या विदेशी चलनातून लघु उद्योग बँकेने मंजूर केलेली सर्व कर्जे व अग्रिमे, ती देण्यात आली त्यावेळी प्रचलित असलेल्या विनिमय दराने परिगणना केलेल्या भारतीय चलनाइतक्या विदेशी चलनाच्या रुपात व्यक्त करण्यात येतील आणि त्याअन्वये देय रक्कम, असे कर्ज किंवा अग्रिम यांच्या परतफेडीच्यावेळी प्रचलित असलेल्या विनिमय दराने परिगणना केलेल्या तितक्याच भारतीय चलनात परतफेडयोग्य होईल.

(४) केंद्र शासनाने, अन्यथा उपबंधित केलेल नसेल तर, या अधिनियमान्वये कर्जे व अग्रिमे देण्याच्या प्रयोजनार्थ, कलम (१) खाली कोणत्याही विदेशी चलनाच्या उसनवारीच्या संबंधात किंवा संबंधित विदेशी सहकारी एजन्सीला परतफेड करण्यासंबंधात, विनिमयातील कोणत्याही चढउतारामुळे,

(क्) लघु उद्योग क्षेत्रातील औद्योगिक संस्थेकडून कर्ज किंवा अग्रिम यांची परतफेड करावयाचा कालावधी किंवा संस्थेने त्याची प्रत्यक्षात परतफेड केल्याचा कालावधी, यांपैकी जो अधिक मोठा असेल त्या कालावधीत, उपार्जित होणारा कोणताही तोटा किंवा नफा यांची, अशी कर्जे व अग्रिमे यांच्या ग्रहित्याकडून प्रतिपूर्ती करण्यात येईल किंवा, प्रकरणपरत्वे, ग्रहित्याला तो देण्यात येईल ;

(ख्) खंड (क्) मध्ये विनिर्दिष्ट केलेला कालावधी संपल्यानंतर,

(एक) उपार्जित होणारा तोटा व नफा विदेशी विनिमय दरातील नेहमीच्या चढउतारासंबंधात लघु उद्योग बँकेकडून सोसण्यात येईल ;

(दोन) उपार्जित होणारा तोटा व नफा यांची विदेशी चलनाच्या बाजारातील नेहमीच्या चढउतारांव्यतिरिक्त इतर चढउतारासंबंधात केंद्र शासनाकडून प्रतिपूर्ती करण्यात

। येईल किंवा, प्रकरणपरत्वे, तो त्याला देण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**—उपरोक्त असा चढउतार, हा नेहमीचा बाजारभावातील चढउतार आहे किंवा कसे असा प्रश्न उद्भवल्यास, त्याबाबत केंद्र शासन निर्णय घेईल आणि त्यावरील त्याचा निर्णय अंतिम असेल.

**२०.** लघु उद्योग बँकेला, शासनाकडून किंवा अन्य कोणत्याही मार्गाने येणारी दाने, अनुदाने, देणग्या, धर्मदाने किंवा इतर पैसा घेता येईल. लघु उद्योग बँकेला अनुदाने, देणग्या इ.

## प्रकरण पाच

## लघु उद्योग विकास सहाय्य निधी

**२१.** (१) केंद्र शासन अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकापासून, लघु उद्योग बँक, लघु उद्योग विकास सहाय्य निधी या नावाचा विशेष निधी स्थापन करील आणि ठेवील. लघु उद्योग विकास सहाय्य निधी.

(२) लघु उद्योग बँकेला, विकास बँकेच्या शिफारशीवरून, केंद्र शासन मान्यता देईल अशा प्रयोजनासाठी किंवा प्रयोजनांसाठी, लघु उद्योग विकास सहाय्य निधीचाच एक भाग म्हणून, कोणत्याही वेळी, कोणताही निधी स्थापन करता येईल अथवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे व अन्वये आवश्यक करण्यात येईल असा कोणताही निधी स्थापन करता येईल.

**२२.** लघु उद्योग विकास सहाय्य निधीमध्ये खालील रकमा जमा करण्यात येतील :— लघु उद्योग विकास सहाय्य निधीतील जमा रकमा.

(क्) त्या निधीच्या प्रयोजनासाठी शासनाकडून वा अन्य कोणत्याही मार्गाने कर्जे, दाने, अनुदाने, देणग्या, धर्मदाने म्हणून वा अन्यथा मिळालेल्या सर्व रकमा ;

(ख्) निधीतून देण्यात आलेली कर्जे, अग्रिमे वा इतर सुविधा यांच्यासंबंधातील परतफेडीच्या वा वसुलीच्या रकमा ;

(ग्) निधीतून गुंतवणुकीपासून मिळालेले उत्पन्न वा नफा ; आणि

(घ्) कलम २३ च्या उपबंधानुसार निधीचा वापर केल्यामुळे व्याज म्हणून वा अन्यथा निधीला उपार्जित होणारे व उद्भवणारे उत्पन्न.

लघु उद्योग विकास सहाय्य निधीचा विनियोग.

**२३.** लघु उद्योग बँकेला, लघु उद्योग सहाय्य निधीतून, विकास बँकेच्या शिफारशीवरून, केंद्र शासन विनिर्दिष्ट करील अशा प्रयोजनांसाठी कोणतीही रक्कम संवितरित करता येईल किंवा खर्च करता येईल.

लघु उद्योग विकास खर्च सहाय्य निधीच्या खाती नोंदी.

**२४.** (१) लघु उद्योग विकास सहाय्य निधीच्या खर्चखाती खालील रकमा घालण्यात येतील :–

(क) कलम २३ अन्वये वेळोवेळी संवितरित किंवा खर्च करता येतील अशा रकमा ;

(ख) त्या निधीच्या प्रयोजनासाठी घेतलेल्या कर्जाच्या संबंधातील दायित्वे चुकती करण्यासाठी आवश्यक असतील अशा रकमा ;

(ग) त्या निधीतून केलेल्या गुंतवणुकीमुळे होणारा कोणताही तोटा ; आणि

(घ) मंडळाकडून निर्धारित करण्यात येईल त्यानुसार, त्या निधीचे प्रशासन व विनियोग यापोटी किंवा त्यासंबंधात उद्भवणारा खर्च.

(२) पोटकलम (१) मध्ये उपबंधित केले असेल ते खेरीजकरून एरव्ही, लघु उद्योग विकास सहाय्य निधीच्या खर्चखाती कोणतीही रक्कम टाकण्यात येणार नाही.

लघु उद्योग विकास सहाय्य निधीचे लेखे व लेखापरीक्षा.

**२५.** (१) लघु उद्योग विकास सहाय्य निधीचा ताळेबंद व लेखे विहित करण्यात येईल अशा नमुन्यांत व अशा रीतीने तयार करण्यात येतील.

(२) मंडळ, लघु उद्योग विकास सहाय्य निधीची पुस्तके व लेखे दरवर्षी ३१ मार्च रोजी किंवा विकास बँक विनिर्दिष्ट करील अशा अन्य दिनांकास असल्याप्रमाणे बंद व संतुलित करण्याची व्यवस्था करील.

(३) कलम ३० अन्वये विकास बँकेने नियुक्त केलेला एक किंवा अधिक लेखापरीक्षक लघु उद्योग विकास सहाय्य निधीची लेखापरीक्षा करतील आणि ते त्यावरील वेगळा अहवाल देतील.

(४) कलम ३० च्या पोटकलमे (२), (३) व (४) चे उपबंध, शक्य असेल तेथवर, लघु उद्योग विकास सहाय्य निधीच्या लेखापरीक्षेसंबंधात लागू होतील.

(५) लघु उद्योग बँक, केंद्र शासनाला आणि विकास बँकेला, लघु उद्योग विकास सहाय्य निधीच्या लेखापरीक्षकांचा अहवाल आणि संबंधित वर्षातील त्या निधीच्या व्यवहारांबाबतचा अहवाल यांच्या प्रतीसह ताळेबंद व लेखे यांची प्रत, त्या निधीचे लेखे बंद व संतुलित करण्यात आल्याच्या दिनांकापासून चार महिन्यांच्या कालावधीत सादर करील आणि केंद्र शासन, त्या प्रती प्राप्त झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर त्या मांडण्याची व्यवस्था करील.

लघु उद्योग विकास सहाय्य निधीचे समापन.

**२६.** लघु उद्योग विकास सहाय्य निधी, केंद्र शासनाच्या आदेशाखेरीज आणि ते शासन, विकास बँकेच्या शिफारशींवरून निदेशित करील अशा रीतीखेरीज अन्य रीतीने बंद किंवा परिसमापित केला जाणार नाही.

## प्रकरण सहा

## लघु उद्योग सर्वसाधारण निधी, लेखे व लेखापरीक्षा

लघु उद्योग सर्वसाधारण निधी.

**२७.** (१) या अधिनियमान्वये लघु उद्योग विकास सहाय्य निधीमध्ये जमा करावयाच्या रकमांखेरीज लघु उद्योग बँकेच्या इतर सर्व जमा रकमा लघु उद्योग सर्वसाधारण निधी या नावाने ओळखला जाईल अशा निधीत जमा करण्यात येतील आणि लघु उद्योग बँकेने करावयाची लघु उद्योग विकास सहाय्य निधीच्या खर्चखाती टाकावयाची प्रदाने खेरीजकरून इतर सर्व प्रदाने लघु उद्योग सर्वसाधारण निधीतून करण्यात येतील.

लेखे व ताळेबंद तयार करणे.

**२८.** (१) लघु उद्योग बँकेचा ताळेबंद व लेखे, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व रीतीने तयार करण्यात येतील.

(२) मंडळ, लघु उद्योग बँकेची पुस्तके व लेखे, प्रत्येक वर्षी ३१ मार्च रोजी किंवा विकास बँक विनिर्दिष्ट करील अशा अन्य दिनांकी असल्याप्रमाणे बंद व संतुलित करण्याची व्यवस्था करील.

लघु उद्योग सर्वसाधारण निधीकडे उपार्जित होणाऱ्या नफ्याचा विनियोग.

**२९.** (१) लघु उद्योग बँकेला राखीव निधी स्थापन करता येईल व यामध्ये लघु उद्योग सर्वसाधारण निधीकडे उपार्जित होणाऱ्या वार्षिक नफ्यातील, त्या बँकेला योग्य वाटतील अशा रकमा हस्तांतरित करता येतील.

(२) बुडीत व संशयास्पद ऋण, मत्तेचा घसारा यांसाठी आणि ज्यांच्यासाठी उपबंध आवश्यक वा इष्ट आहे अशा किंवा बहुदा बँकर्स ज्यांच्यासाठी तरतूद करतात अशा सर्व बाबी, आणि पोटकलम (१)

मध्ये निर्देशिलेला राखीव निधी यांसाठी, उपबंध केल्यानंतर, लघु उद्योग बँक, निव्वळ नफ्यातील शिल्लक विकास बँकेकडे हस्तांतरित करील.

**३०.** (१) लघु उद्योग बँकेच्या लेख्यांची परीक्षा, कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) याच्या कलम २२६ च्या पोटकलम (१) अन्वये लेखापरीक्षक म्हणून कार्य करण्यासाठी यथोचितरित्या अर्हता प्राप्त केलेले लेखापरीक्षक करतील आणि विकास बँक निश्चित करील अशा अटींवर व अशा पारिश्रमिकावर विकास बँक त्यांची नियुक्ती करील. लेखापरीक्षा.

(२) लेखापरीक्षकांना लघु उद्योग बँकेच्या वार्षिक ताळेबंदाची प्रत पुरवण्यात येईल आणि त्या ताळेबंदाशी संबंधित लेखे व प्रमाणके यांसह त्याची तपासणी करणे हे त्यांचे कर्तव्य असेल आणि लघु उद्योग बँकेने ठेवलेल्या सर्व पुस्तकांची सूची त्यांच्याकडे पाठविली जाईल आणि लघु उद्योग बँकेची सर्व पुस्तके, लेखे, प्रमाणके व इतर दस्तऐवज, सर्व वाजवी वेळी त्यांना उपलब्ध होऊ शकतील.

(३) लेखापरीक्षकांना, अशा लेख्यांसबंधात लघु उद्योग बँकेचा कोणताही संचालक वा कोणताही अधिकारी वा इतर कर्मचारी यांची तपासणी करता येईल आणि त्यांच्या कर्तव्यपालनार्थ त्यांना आवश्यक वाटेल अशी माहिती व स्पष्टीकरण लघु उद्योग बँकेचे मंडळ अथवा अधिकारी वा इतर कर्मचारी यांच्याकडून मागविण्यास हक्कदार असतील.

(४) लेखापरीक्षक, लघु उद्योग बँकेला त्यांनी तपासणी केलेला वार्षिक ताळेबंद व लेखे यांवरील अहवाल देतील आणि हा ताळेबंद म्हणजे त्यांच्या मते लघु उद्योग बँकेच्या परिस्थितीचे यथातथ्य व वाजवी दर्शन होईल असा सर्व आवश्यक तपशील अंतर्भूत असणारा आणि योग्य रीतीने तयार केलेला संपूर्ण वाजवी ताळेबंद आहे किंवा कसे ते आणि त्यांनी लघु उद्योग बँकेच्या मंडळाकडून किंवा कोणत्याही अधिकाऱ्याकडून वा इतर कर्मचाऱ्यांकडून कोणतेही स्पष्टीकरण वा माहिती मागविली असल्यास ती देण्यात आली आहे का आणि समाधानकारक आहे का ते, अशा प्रत्येक अहवालात नमूद करतील.

(५) लघु उद्योग बँक, तिचे लेखे बंद व संतुलित करण्यात आल्याच्या दिनांकापासून चार महिन्यांच्या आत, केंद्र शासनाला आणि विकास बँकेला, आपल्या ताळेबंदाची व लेख्यांची प्रत, लेखापरीक्षकाचा अहवाल व संबंधित वर्षातील लघु उद्योग बँकेच्या कामकाजाचा अहवाल यांच्या प्रतींसह, सादर करील आणि केंद्र शासन, त्या प्रती त्यांच्याकडे आल्यानंतर त्या शक्य तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्याची व्यवस्था करील.

**३१.** कलम २५ च्या पोटकलम (४) मध्ये अन्यथा उपबंधित केले असेल ते खेरीजकरून, या प्रकरणात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट लघु उद्योग विकास सहाय्य निधीला लागू होणार नाही. व्यावृत्ती.

## प्रकरण सात

## विकास बँकेच्या उद्योगधंद्याच्या भागाचे हस्तांतरण

**३२.** (१) केंद्र शासन, अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास, विकास बँकेचा, लघु उद्योग विकास निधी आणि राष्ट्रीय सामान्य शेअर निधी (नॅशनल इक्विटी फंड) (या कलमात यापुढे " निधी " म्हणून निर्देशिलेल्या) यांच्या संबंधातील उद्योग, धंदा, मत्ता व दायित्वे, अधिकार, हितसंबंध, विशेषाधिकार आणि आबंधने, लघु उद्योग बँकेकडे हस्तांतरित आणि निहित राहतील. विकास बँकेच्या उद्योगधंद्याच्या भागाचे हस्तांतरण.

**स्पष्टीकरण.—**" लघु उद्योग विकास निधी " आणि " राष्ट्रीय सामान्य शेअर निधी " याचा अर्थ, विकास बँकेचा पुस्तके व लेखे यांमध्ये, या पोटकलमात नियत केलेल्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या दिवशी तशा प्रकारे उल्लेख करण्यात आलेला लघु उद्योग विकास निधी व राष्ट्रीय सामान्य शेअर निधी, असा आहे.

(२) लघु उद्योग बँकेकडे पोटकलम (१) अन्वये निधीचे हस्तांतरण होण्यासाठी व ते निहित होण्यासाठी, ती बँक, विकास बँकेकडे, विकास बँक निर्धारित करील अशा रकमेचे, तशा अटी व शर्तींवर प्रदान करील.

(३) निधीशी संबंधित आणि पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या दिनांकाच्या निकटपूर्वी विद्यमान किंवा परिणामक असलेल्या आणि ज्यामध्ये विकास बँक हा एक पक्ष आहे किंवा ज्या विकास बँकेच्या नावे आहेत अशा सर्व संविदा, विलेख, बंधपत्रे, करार, मुख्यत्यारनामे, कायदेशीर प्रतिनिधित्वपत्र आणि कोणत्याही स्वरूपाचे इतर संलेख—

(क) ते केवळ निधींशीच संबंधित असतील तर, लघु उद्योग बँकेविरुद्ध किंवा बँकेच्या नावे पूर्णपणे अंमलात आणि परिणामक किंवा तिला अनुकूल असतील आणि जणू काही विकास बँके-

ऐवजी लघु उद्योग बँकच त्यांमधील एक पक्ष असल्याप्रमाणे किंवा ते लघु उद्योग बँकेच्या नावे काढण्यात आले असल्याप्रमाणे अंमलात आणता येतील व त्यांवर कृती करता येईल ; आणि

(ख) ते केवळ निधींशीच नव्हे तर, विकास बँकेचा इतर कोणताही उद्योगधंदा किंवा कार्ये यांच्याशीही संबंधित असतील तर, विकास बँक व लघु उद्योग बँक या दोन्हीच्या विरुद्ध किंवा त्यांच्या नावे पूर्णतः अंमलात व परिणामक असतील, आणि विकास बँकेबरोबर लघु उद्योग बँकही जणू काही त्यातील एक पक्ष असल्याप्रमाणे किंवा ते विकास बँकेच्या तसेच लघु उद्योग बँकेच्याही नावे काढण्यात आले असल्याप्रमाणे पूर्णपणे व परिणामकारकपणे अंमलात आणता येतील किंवा त्यावर कृती करता येईल.

(४) पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या दिनांकास, निधींशी संबंधित कोणताही दावा, अपील किंवा कोणत्याही स्वरूपाची अन्य वैध कार्यवाही प्रलंबित असेल तर विकास बँकेचा उद्योगधंदा लघु उद्योग बँकेकडे हस्तांतरित झाल्याच्या कारणाने किंवा या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे, त्याचे अवसान होणार नाही, त्यात खंड पडणार नाही किंवा त्यावर कोणत्याही प्रकारे बाधक परिणाम होणार नाही मात्र, तो दावा, अपील किंवा अन्य कार्यवाही—

(क) केवळ निधीशींच संबंधित असेल तेव्हा, लघु उद्योग बँकेकडून व तिच्याविरुद्ध चालू ठेवता, अभियोजित करता व अंमलात आणता येईल ; आणि

(ख) ती केवळ निधींशीच नव्हे तर विकास बँकेच्या अन्य उद्योगधंद्यांपैकी कोणत्याही उद्योगधंद्याशी वा कार्याशी संबंधित असेल तेव्हा, विकास बँक व लघु उद्योग बँक यांच्याकडून वा त्यांच्याविरुद्ध अथवा केंद्र शासनाने लेखी आदेशाद्वारे निदेशित केल्यास, अशा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल त्यानुसार त्यांच्यापैकी कोणत्याही एका बँकेकडून वा तिच्याविरुद्ध चालू ठेवता, अभियोजित करता आणि अंमलात आणता येईल.

(५) पोटकलम (३) मध्ये निर्देशिलेली कोणतीही संविदा, विलेख, बंधपत्र, करार, मुखत्यारनामा, कायदेशीर प्रतिनिधित्वपत्र किंवा इतर संलेख अथवा पोटकलम (४) मध्ये निर्देशिलेला कोणताही दावा, अपील किंवा इतर वैध कार्यवाही केवळ निधींशीच संबंधित आहे किंवा आहेत काय असा कोणताही प्रश्न उद्‌भवेल अशा बाबतीत, तो निर्णयासाठी विकास बँकेकडे पाठविण्यात येईल आणि विकास बँकेचा त्यावरील निर्णय अंतिम असेल.

(६) भारतीय औद्योगिक विकास बँक अधिनियम, १९६४ (१९६४ चा १८) किंवा अन्य कोणताही कायदा किंवा उक्त अधिनियम वा अन्य कायदा याच्यामुळे प्रभावी असलेला कोणताही संलेख यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या कलमाचे उपबंध परिणामक असतील.

## प्रकरण आठ

## संकीर्ण

लघु उद्योग बँकेचा कर्मचारीवर्ग.

**३३.** (१) लघु उद्योग बँकेला आपली कार्ये दक्षतेने पार पाडण्यासाठी, तिला आवश्यक किंवा इष्ट वाटतील इतके अधिकारी व अन्य कर्मचारी यांची नियुक्ती करता येईल आणि त्यांची नियुक्ती व सेवा यांच्या अटी व शर्ती निर्धारित करता येतील.

(२) नियत दिनांकापासून सहा महिन्यांचा कालावधी संपण्यापूर्वी कोणत्याही वेळी विकास बँकेला आपल्या कर्मचारीवर्गापैकी ज्या व्यक्ती लघु उद्योग बँकेच्या कार्यासाठी विकास बँकेला संबद्ध किंवा योग्य वाटतील त्या व्यक्तींची, लघु उद्योग बँकेकडे केलेली प्रतिनियुक्ती म्हणून लघु उद्योग बँकेकडे लोकहितार्थ बदली करता येईल, परंतु, अशा व्यक्ती, लघु उद्योग बँक स्थापनच झाली नसती तर, त्या पदासाठी आणि पारिश्रमिक, रजा, भविष्यनिर्वाह निधी, सेवानिवृत्ती किंवा इतर अंतिम लाभ यासंबंधातील सेवेच्या ज्या अटी व शर्ती यानुसार व ज्या पदावधीसाठी त्यांनी पद धारण केले असते त्याच पदावधीसाठी आणि त्याच अटींवर व शर्तींवर पद धारण करतील आणि विकास बँक, एकतर स्वतः होऊन किंवा लघु उद्योग बँकेच्या विनंतीवरून, कर्मचारीवर्गातील अशा व्यक्तींना आपल्या सेवेत परत बोलवेपर्यंत तसे करणे चालू ठेवतील :

परंतु, असा तऱ्हेने बदली करण्यात आलेल्या कर्मचारीवर्गातील प्रत्येक व्यक्तीला नियत दिनांकापासून नऊ महिन्यांचा कालावधी संपण्यापूर्वी, विकास बँकेकडे परत जाण्याच्या लेखी पर्यायाचा वापर करून त्याप्रमाणे परत जाता येईल आणि अशा पर्यायाचा वापर केल्यानंतर, विकास बँक, नियत दिनांकापासून अठरा महिन्यांचा

कालावधी संपण्यापूर्वी, कर्मचारीवर्गातील अशा व्यक्तीला परत घेईल आणि ज्या कालावधीत ती व्यक्ती लघु उद्योग बँकेच्या कर्मचारीवर्गातील व्यक्ती होती त्या कालावधीपुरती ती लघु उद्योग बँकेकडे प्रतिनियुक्तीवर असल्याचे समजण्यात येईल.

(३) औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ (१९४७ चा १४) किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेला अन्य कोणताही कायदा यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी कर्मचारीवर्गातील कोणत्याही व्यक्तीला लघु उद्योग बँकेने या कलमान्वये आपल्या नियमित सेवेत सामावून घेतल्याच्या परिणामी असा कर्मचारी, तो अधिनियम किंवा अन्य कायदा याखालील कोणत्याही भरपाईस हक्कदार होणार नाही आणि तशी कोणतीही हक्कमागणी कोणतेही न्यायालय, अधिकरण किंवा अन्य प्राधिकरण यांच्याकडून विचारार्थ स्वीकारली जाणार नाही.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनासाठी "नियत दिनांक" याचा अर्थ, कलम ३ अन्वये लघु उद्योग बँकेची स्थापना झाल्याचा दिनांक, असा आहे.

शक्तींचे प्रत्यायोजन.

३४. मंडळाला, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे कोणताही संचालक अथवा कलम १२ अन्वये घटित झालेली समिती अथवा लघु उद्योग बँकेचा कोणताही अधिकारी वा इतर कर्मचारी यांच्याकडे आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा कोणत्याही शर्ती व मर्यादा असल्यास, त्यांच्या अधीनतेने, त्याला योग्य वाटतील अशा त्याच्या या अधिनियमाखालील शक्ती व कर्तव्ये, प्रत्यायोजित करता येतील.

विवरणे.

३५. लघु उद्योग बँक केंद्र शासन, रिझर्व्ह बँक विकास बँक यांच्याकडे त्यांच्याकडून मागणी करण्यात येतील अशी विवरणे, वेळोवेळी सादर करील.

इमानदारी व गुप्तता यासंबंधातील आबंधने.

३६. (१) या अधिनियमान्वये वा अन्य कोणत्याही कायद्यान्वये अन्यथा आवश्यक करण्यात आले असेल ते खेरीजकरून, लघु उद्योग बँक तिचे घटक किंवा त्यांचे व्यवहार यासंबंधातील कोणत्याही माहितीचा, कोणत्याही कायद्यानुसार किंवा बँक व्यवसायींमध्ये रूढ असलेली प्रथा व परिपाठ यांनुसार अशा माहितीचा गौप्यभेद करणे आवश्यक वा यथोचित असेल अशा परिस्थिती खेरीजकरून, इतर वेळी गौप्यभेद करणार नाही.

(२) लघु उद्योग बँकेला, या अधिनियमाखालील कार्ये दक्षतेने पार पाडण्याच्या प्रयोजनार्थ, तिला योग्य वाटेल अशा रीतीने आणि अशा वेळी, तिला त्या प्रयोजनासाठी उपयुक्त वाटेल अशी कर्जविषयक माहिती वा इतर माहिती, केंद्र शासन, रिझर्व्ह बँक, विकास बँक, स्टेट बँक, कोणतीही दुय्यम बँक, राष्ट्रीयीकृत बँक किंवा इतर अनुसूचित बँक, राज्य सहकारी बँक, राज्य वित्तीय निगम, राज्य औद्योगिक विकास निगम, राज्य लघु उद्योग निगम किंवा राष्ट्रीय लघु उद्योग निगम किंवा विकास बँक विनिर्दिष्ट करील अशा अन्य संस्था, यांच्याकडून मिळवता येईल किंवा त्यांना सादर करता येईल.

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ, "कर्जविषयक माहिती" या शब्दप्रयोगाला, भारतीय रिझर्व्ह बँक अधिनियम,-१९३४ च्या (१९३४ चा २) कलम ४५ क च्या खंड (ग) मध्ये जो अर्थ असेल तोच अर्थ असेल, मात्र, "बँक व्यवसायी कंपनी" म्हणजे, चा पोटकलमात निर्देशिलेली बँक, निगम वा इतर संस्था या फेरबदलाच्या अधीनतेने, त्या शब्दप्रयोगाचा अर्थ लावला जाईल.

(३) या अधिनियमाच्या उपबंधान्वये ज्याच्या सेवांचा लघु उद्योग बँकेकडून वापर करण्यात येत असेल अशा, लघु उद्योग बँकेचा किंवा विकास बँकेचा प्रत्येक संचालक, समितीचा सदस्य, लेखापरीक्षक, अधिकारी वा इतर कर्मचारी त्यांची कर्तव्ये हाती घेण्यापूर्वी, या अधिनियमाच्या पहिल्या अनुसूचित नमूद केलेल्या नमुन्यात इमानदारी व गुप्तता याचे अधिकथन करील.

नियुक्तीमधील दोषांमुळे कृती, इ. विधिबाह्य ठरणार नाहीत.

३७. (१) लघु उद्योग बँकेच्या किंवा मंडळाच्या कोणत्याही समितीच्या कोणत्याही कृतीस किंवा कार्यवाहीस, मंडळ किंवा प्रकरणपरत्वे, समिती यांमध्ये केवळ कोणतेही रिक्त पद किंवा त्यांच्या घटनेमध्ये दोष असल्याच्या कारणावरून हरकत घेतली जाणार नाही.

(२) संचालक म्हणून सद्भावपूर्वक कार्य करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने केलेली कोणताही कृती, केवळ ती व्यक्ती संचालक म्हणून निरर्ह ठरविण्यात आली होती किंवा तिच्या नियुक्तीमध्ये अन्य कोणताही दोष होता या कारणावरून विधिअग्राह्य असल्याचे मानण्यात येणार नाही.

कसुरीच्या बाबतीत लघु उद्योग बँकेचे अधिकार.

३८. (१) जेव्हा एखाद्या करारान्वये लघु उद्योग बँक प्रती दायित्वाधीन असलेली लघु उद्योग क्षेत्रातील कोणतीही औद्योगिक संस्था, तिचे कोणतेही कर्ज, किंवा अग्रिम किंवा त्याचा कोणताही हप्ता यांची परतफेड करण्यात अथवा लघु उद्योग बँकेकडून देण्यात आलेल्या कोणत्याही हमी संबंधातील कोणतेही आबंधन

निभावण्यात कसूर करील अशा बाबतीत, अथवा लघु उद्योग बँकेशी तिने केलेल्या कराराच्या अटींचे पालन करण्यात अन्यथा चूक करील अशा बाबतीत लघु उद्योग बँकेला, लघु उद्योग क्षेत्रातील अशा औद्योगिक संस्थेचे व्यवस्थापन वा कब्जा वा दोन्ही आपल्या हाती घेऊन भाडेपट्टा किंवा विक्री याद्वारे हस्तांतरित करण्याचा अधिकार असेल, तसेच लघु उद्योग बँकेला तारण दिलेली, तिच्याकडे गहाण ठेवलेली किंवा तारणगहाण ठेवलेली किंवा अभिहस्तांकित केलेली संपत्ती वसूल करण्याचा अधिकार असेल.

(२) लघु उद्योग बँकेने पोटकलम (१) खालील आपल्या शक्तींचा वापर करून केलेल्या संपत्तीच्या कोणत्याही हस्तांतरणामुळे ते हस्तांतरण जणू काही संपत्तीच्या मालकाकडून करण्यात आले असल्याप्रमाणे, हस्तांतरित संपत्तीतील या संपत्तीबाबत असलेले सर्व अधिकार, हस्तांतरितीकडे निहित होतील.

(३) लघु उद्योग बँकेला, तिने धारण केलेल्या प्रतिभूतीचा हिस्सा असलेल्या मालातून पूर्णतः किंवा अंशतः निर्मित वा उत्पादित मालाच्या संबंधात, तिला मूळ मालाच्या संबंधात जे अधिकार व शक्तीअसतील, तेच अधिकार व शक्ती असतील.

(४) जेव्हा पोटकलम (१) खालील उपबंधांन्वये लघु उद्योग क्षेत्रातील एखाद्या औद्योगिक संस्थेविरुद्ध कोणतीही कारवाई करण्यात आली असेल अशा बाबतीत, लघु उद्योग बँकेने त्या कारवाईच्या अनुषंगाने तिच्या मते योग्यरीत्या केलेला सर्व खर्च, आकार व व्यय, लघु उद्योग क्षेत्रातील औद्योगिक संस्थेकडून वसुलीयोग्य असेल आणि तिला मिळालेला पैसा तद्‌विरुद्ध कोणताही करार केलेला नसल्यास प्रथमतः असे खर्च, आकार व व्यय चुकते करण्यासाठी आणि त्यानंतर लघु उद्योग बँकेला देय असेलेले ऋण चुकते करण्यासाठी, ती बँक न्यास म्हणून धारण करील आणि अशा तऱ्हेने मिळालेल्या पैशातील उर्वरित पैसा त्या हक्कदार असलेल्या व्यक्तीला तिचे अधिकार व हितसंबंध यानुसार देण्यात येतील.

(५) जेव्हा लघु उद्योग बँक, पोटकलम (१) च्या उपबंधान्वये लघु उद्योग क्षेत्रातील एखाद्या औद्योगिक संस्थेचे व्यवस्थापन हाती घेते किंवा तिचा कब्जा घेते अशा बाबतीत, त्या संस्थेकडून वा तिच्याविरुद्ध करण्यात आलेल्या दाव्यांच्या प्रयोजनार्थ, लघु उद्योग बँक ही अशा संस्थेचा मालक असल्याचे मानण्यात येईल, आणि संस्थेच्या नावाने तिला किंवा तिच्यावर दावा लावता येईल.

मुख्य महानगर दंडाधिकारी किंवा जिल्हा दंडाधिकारी यांचे सहाय्य मागण्याची शक्ती.

**३९.** (१) जेव्हा कलम ३८ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही शक्तीनुसार कोणतीही संपत्ती, चीजवस्तू वा कारवाईयोग्य हक्क-मागण्या विकण्यात वा भाडेपट्ट्याने देण्यात येतील अशा बाबतीत, लघु उद्योग बँकेला किंवा तिने प्राधिकृत केलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीला, अशी कोणतीही संपत्ती, चीजवस्तू वा कारवाईयोग्य हक्क-मागण्या कब्जात घेण्याच्या वा नियंत्रणाखाली आणण्याच्या प्रयोजनार्थ, अशी कोणतीही संपत्ती, चीजवस्तू, कारवाईयोग्य हक्क-मागण्या, लेखापुस्तके किंवा तत्संबंधित इतर दस्तऐवज ज्याच्या अधिकारितेत असतील किंवा आढळून येतील त्या मुख्य महानगर दंडाधिकाऱ्याकडे वा जिल्हा दंडाधिकाऱ्याकडे, त्याचा कब्जा घेण्याची लेखी विनंती करता येईल आणि मुख्य महानगर दंडाधिकारी वा जिल्हा दंडाधिकारी, त्याला अशी विनंती करण्यात आल्यानंतर,—

(क्) अशी संपत्ती, चीजवस्तू, कारवाईयोग्य हक्क-मागण्या किंवा लेखापुस्तके वा तत्संबंधित इतर दस्तऐवज यांचा कब्जा घेईल ; आणि

(ख्) ते लघु उद्योग बँक, किंवा, प्रकरणपरत्वे, अशी अन्य व्यक्ती यांच्याकडे अग्रेषित करील.

(२) पोटकलम (१) च्या उपबंधांचे अनुपालन करण्याच्या प्रयोजनार्थ, मुख्य महानगर दंडाधिकारी वा जिल्हा दंडाधिकारी याला, त्याच्या मते, आवश्यक वाटेल अशा उपाययोजना करता येतील वा करवून घेता येतील आणि अशा बलाचा वापर करता येईल वा करवून घेता येईल.

(३) मुख्य महानगर दंडाधिकारी किंवा जिल्हा दंडाधिकारी यांची, या कलमाला अनुलक्षून करण्यात आलेली कोणतीही कृती, कोणत्याही न्यायालयात वा कोणत्याही प्राधिकरणासमोर प्रश्नास्पद केली जाणार नाही.

करारबद्ध कालावधी-पूर्वी परतफेडीची मागणी करण्याची शक्ती.

**४०.** कोणत्याही विरुद्ध करारात काहीही अंतर्भूत असले तरीही, लघु उद्योग बँक, तिने जिला कोणतेही कर्ज वा अग्रिम मंजूर केले असेल अशा, लघु उद्योग क्षेत्रातील कोणत्याही औद्योगिक संस्थेला खालील बाबतीत, तिची लघु उद्योग बँकेकडे असलेली सर्व दायित्वे तात्काळ पूर्णपणे चुकती करण्यात लेखी नोटिशीद्वारे भाग पाडू शकेल—

(क्) कर्ज किंवा अग्रिम यासाठी करण्यात आलेल्या अर्जात, कोणत्याही महत्वाच्या तपशीलात खोटी वा दिशाभूल करणारी माहिती देण्यात आली आहे असे मंडळाला आढळून आले तर ; किंवा

(ख) लघु उद्योग क्षेत्रातील औद्योगिक संस्थेने कर्ज वा अग्रिम यासंबंधात, लघु उद्योग बँकेशी केलेल्या संविदेतील अटींचे अनुपालन करण्यात तिच्याकडून कसूर झाली असेल तर ; किंवा

(ग) लघु उद्योग क्षेत्रातील औद्योगिक संस्था तिचे ऋण चुकते करण्यास असमर्थ आहे वा यासंबंधातील परिसमापनाची कार्यवाही सुरू करता येण्यासारखी आहे, अशी वाजवी आशंका असेल तर ; किंवा

(घ) कर्ज किंवा अग्रिम यासाठी प्रतिभूती म्हणून लघु उद्योग बँकेकडे लघु उद्योग क्षेत्रातील औद्योगिक संस्थेकडून तारण दिलेल्या, गहाण ठेवलेल्या, तारणगहाण ठेवलेल्या वा तिला अभिहस्तांकित केलेल्या संपत्तीचा लघु उद्योग बँकेला समाधानकारक वाटेल अशा रीतीने विमा उतरविलेला नसेल तर ; अथवा तिच्या मूल्यातील घसारा इतका असेल की, मंडळाच्या मते, मंडळाला समाधानकारक वाटेल इतकी आणखी प्रतिभूती देणे आवश्यक असेल आणि अशी प्रतिभूती दिलेली नसेल तर ; किंवा

(ङ) कोणतीही यंत्रसामग्री, संयंत्र वा इतर साधनसामग्री, -मग ती प्रतिभूतीचा भाग असो किंवा नसो,- तिच्या जागी दुसरी न ठेवताच लघु उद्योग क्षेत्रातील औद्योगिक संस्थेच्या परिवास्तूतून मंडळाच्या परवानगीशिवाय हलविण्यात आली असेल तर ; किंवा

(च) कोणत्याही कारणास्तव लघु उद्योग बँकेच्या हितसंबंधाचे संरक्षण करणे आवश्यक असेल तर.

लघु उद्योग बँकेकडील हक्क-मागण्यांच्या अंमल-बजावणीसाठी विशेष उपबंध.

४१. (१) लघु उद्योग क्षेत्रातील एखाद्या औद्योगिक संस्थेने, कोणत्याही कराराचा भंग करून कोणतेही कर्ज वा अग्रिम वा त्याचा कोणताही हप्ता यांची परतफेड करण्यात अथवा लघु उद्योग बँकेकडून देण्यात आलेल्या कोणत्याही हमी संबंधातील तिची आबंधने निभावण्यात कसूर केल्यास अथवा बँकेशी झालेल्या तिच्या करारांच्या अटींचे अनुपालन करण्यात अन्यथा चूक केल्यास अथवा लघु उद्योग बँकेने, लघु उद्योग क्षेत्रातील कोणत्याही औद्योगिक संस्थेस कलम ४० अन्वये कोणतेही कर्ज वा अग्रिम यांची परतफेड करणे आवश्यक केले असेल आणि अशा औद्योगिक संस्थेने अशी परतफेड करण्यात कसूर केली असेल तर अशा बाबतीत, या अधिनियमाचे कलम ३८ व संपत्ति हस्तांतरण अधिनियम, १८८२ (१८८२ चा ४) चे कलम ६९ याच्या उपबंधास बाध न आणता, यासंबंधात त्या बँकेकडून सर्वसाधारणतः वा विशेषतः प्राधिकृत करण्यात आलेल्या त्या बँकेच्या कोणत्याही अधिकाऱ्याला न्यायालयाकडे खालील एका किंवा अधिक अनुतोषांसाठी अर्ज करता येईल, ते असे :—

(क) कर्ज किंवा अग्रिम यासाठी प्रतिभूती म्हणून त्या बँकेकडे अभिहस्तांकित केलेल्या प्रभारित केलेल्या, तारणगहाण ठेवलेल्या, गहाण ठेवलेल्या वा तारण दिलेल्या संपत्तीच्या विक्रीच्या आदेशांसाठी ; किंवा

(ख) कोणत्याही प्रतिभूच्या दायित्वाच्या बजावणीसाठी ; किंवा

(ग) लघु उद्योग क्षेत्रातील औद्योगिक संस्थेची यंत्रसामग्री, संयंत्र किंवा साधनसामग्री अशा औद्योगिक संस्थेच्या परिवास्तूतून, हस्तांतरित करण्याची वा हलवण्याची आशंका असेल अशा बाबतीत लघु उद्योग बँकेच्या परवानगीशिवाय असे हस्तांतरण करण्यास वा तो हलवण्यास निरोधित करणारा अंतरिम व्यादेश देण्यासाठी.

(२) पोटकलम (१) खालील अर्जामध्ये, लघु उद्योग क्षेत्रातील औद्योगिक संस्थेच्या लघु उद्योग बँकेकडे असलेल्या दायित्वाचे स्वरूप व व्याप्ती, अर्ज करण्यात आल्याचे कारण आणि अर्ज करण्यात आलेला अनुतोष मिळवण्यासाठी आवश्यक असेल असा इतर तपशील नमूद करण्यात येईल.

(३) पोटकलम (१) च्या खंड (क) व खंड (ग) मध्ये उल्लेखिलेल्या अनुतोषांसाठी अर्ज करण्यात आला असेल अशा बाबतीत, न्यायालय, प्रतिभूतिवर किंवा लघु उद्योग क्षेत्रातील औद्योगिक संस्थेच्या संपत्तीचा जेवढा भाग विकल्यामुळे, अशा औद्योगिक संस्थेचे, लघु उद्योग बँकेकडे असलेले अदत्त दायित्व आणि या कलमान्वये करण्यात आलेल्या कार्यवाहीचा खर्च, या दोहोंच्या मूल्याइतकी रक्कम वसूल प्राप्त करता येईल असा न्यायालयाचा अंदाज असेल तेवढ्या भागांवर, जप्ती आणण्याचा अंतरिम व्यादेश अशा औद्योगिक संस्थेला तिची यंत्रसामग्री, संयंत्र या साधनसामग्री हस्तांतरित करण्यास वा हलविण्यास निरोधित करणाऱ्या अंतरिम व्यादेशासह किंवा त्याविना देईल.

(४) पोटकलम (१) च्या खंड (ख) मध्ये उल्लेखिलेल्या अनुतोषांसाठी अर्ज करण्यात आला असेल अशा बाबतीत, न्यायालय प्रतिभूला दायित्वाची बजावणी का करण्यात येऊ नये त्याचे कारण, नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या दिनांकास दाखवण्याची नोटीस काढील.

(५) पोटकलम (३) अन्वये कोणताही आदेश किंवा पोटकलम (४) अन्वये कोणतीही नोटीस काढण्यापूर्वी, न्यायालयाला, त्याला योग्य वाटत असेल तर, अर्ज करणाऱ्या अधिकाऱ्याची तपासणी करता येईल.

(६) पोटकलम (३) अन्वये आदेश काढण्यात येईल त्याचवेळी, न्यायालय, लघु उद्योग क्षेत्रातील औद्योगिक संस्थेला किंवा टाच आणलेल्या प्रतिभूतीच्या मालकाला टाच आणण्याचा अंतरिम आदेश अंतिम का करण्यात येऊ नये आणि व्यादेश कायम का करण्यात येऊ नये यासंबंधात, नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या दिनांकास कारणे दाखवण्यास फर्मावणारी नोटीस काढील ; आणि त्या नोटिशीसह आदेशाच्या, अर्जाच्या व न्यायालयाने काही पुरावा अभिलिखित केला असल्यास त्या पुराव्याच्या प्रती जोडील.

(७) पोटकलम (४) खालील नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या दिनांकास किंवा त्यापूर्वी कोणतेही कारण दाखविले नाही तर, न्यायालय, प्रतिभूच्या दायित्वाच्या बजावणीचा तात्काळ आदेश देईल.

(८) पोटकलम (६) खालील नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या दिनांकास किंवा त्यापूर्वी कोणतेही कारण दाखविले नाही तर, न्यायालय, अंतरिमकालीन आदेश तात्काळ अंतिम करील व जप्त करण्यात आलेल्या संपत्तीची विक्री निर्देशित करील किंवा व्यादेश कायम करील.

(९) कारण दाखविले तर, न्यायालय, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) मध्ये अंतर्भूत असलेल्या उपबंधांनुसार, असे उपबंध लागू करता येतील तेथपर्यंत, लघु उद्योग बँकेच्या हक्कमागणीचे अन्वेषण सुरू करील.

(१०) पोटकलम (९) अन्वये अन्वेषण केल्यानंतर, न्यायालयाला—

(क) जप्तीचा आदेश कायम करता येईल आणि जप्त केलेल्या संपत्तीची विक्री निर्देशित करता येईल ;

(ख) संपत्तीचा भाग जप्तीतून मुक्त करता येईल असा रीतीने आदेशात बदल करता येईल आणि जप्त केलेल्या संपत्तीतील उर्वरित संपत्तीची विक्री निदेशित करता येईल ;

(ग) संपत्ती जप्तीतून मुक्त करता येईल ;

(घ) व्यादेश कायम करता येईल या विसर्जित करता येईल ; अथवा

(ङ) प्रतिभूच्या दायित्वाच्या बजावणीचा निदेश देता येईल वा यासंबंधात करण्यात आलेली हक्कमागणी फेटाळता येईल :

परंतु, खंड (ग) अन्वये आदेश देताना वा कलम (ङ) खालील प्रतिभूच्या दायित्वाच्या बजावणीची हक्कमागणी फेटाळण्याचा आदेश देताना, न्यायालयाला, लघु उद्योग बँकेचे हितसंबंध जपण्यासाठी त्याला आवश्यक असा पुढील आदेश देता येईल आणि त्याला योग्य वाटेल अशा रीतीने कार्यवाहीचा खर्च संविभाजित करता येईल :

परंतु, आणखी-असे की, जप्तीतून कोणतीही संपत्ती मुक्त करणाऱ्या वा प्रतिभूच्या दायित्वाच्या बजावणीची हक्कमागणी फेटाळणाऱ्या कोणत्याही आदेशाविरुद्ध आपण अपील करणार नाही असे लघु उद्योग बँकेकडून न्यायालयाला कळवले जाईपर्यंत पोटकलम (१२) खाली निश्चित करण्यात आलेल्या ज्या कालावधीत अपील दाखल करता येईल ते संपेपर्यंत अथवा अपील दाखल करण्यात आले तर, उक्त न्यायालयाच्या निर्णयावरील अपिलांची सुनावणी करण्याची शक्ती प्रदान करण्यात आलेल्या न्यायालयाने अन्यथा निदेशित केले नसल्यास, अपील निकालात काढले जाईपर्यंत असा आदेश परिणामक करता येणार नाही.

(११) या कलमाखालील संपत्तीच्या जप्तीचा वा विक्रीचा आदेश हा, लघु उद्योग बँक ही जणू काही हुकूमनामाधारक असल्याप्रमाणे, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) मध्ये हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना संपत्तीची जप्ती करण्यासाठी वा विक्री करण्यासाठी उपबंधित केलेल्या रीतीने, व्यवहार्य असेल तेथवर, अंमलात आणण्यात येईल.

(१२) पोटकलम (७), पोटकलम (८) वा पोटकलम (१०) खालील आदेशाद्वारे व्यथित झालेला कोणताही पक्ष, आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, ज्या न्यायालयाने आदेश दिला असेल त्या न्यायालयांच्या निर्णयांवरील अपिलांची सुनावणी करण्याची शक्ती प्रदान करण्यात आलेल्या न्यायालयाकडे अपील करील आणि अशा अपिलानंतर, अपिलीय न्यायालयाला, पक्षाचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, त्याला योग्य वाटतील असे आदेश देता येतील.

(१३) लघु उद्योग क्षेत्रातील औद्योगिक संस्थेसंबंधातील समापनासाठी कार्यवाही, पोटकलम (१) अन्वये अर्ज करण्यापूर्वी सुरू झाली असेल अशा बाबतीत, या कलमातील कोणत्याही गोष्टींचा अर्थ, लघु उद्योग बँकेला, तिला अन्य कोणत्याही कायद्याद्वारे प्रदान करण्यात आलेला नाही असा, अशा औद्योगिक संस्थेच्या इतर ऋणकोपेक्षा पसंतीक्रम दिला जातो, असा लावला जाणार नाही.

(१४) शंका निरसनार्थ, याद्वारे असे जाहीर करण्यात येत आहे की, या कलमान्वये अंतरिमकालीन आदेश देण्यास सक्षम असलेल्या कोणत्याही न्यायालयाला, प्रापकाची नियुक्ती करण्याची आणि तद्नुषंगिक इतर सर्व शक्तींचा वापर करण्याचीही शक्ती असेल.

**लघु उद्योग बँकेला अभिलेख उपलब्ध असणे.**

**४२.** (१) लघु उद्योग बँकेला, तिच्याकडून कोणत्याही पतसुविधांचा उपयोग करून घेऊ इच्छिणाऱ्या कोणत्याही संस्थेचे असे सर्व अभिलेख आणि अशा संस्थेकडून कोणत्याही पतसुविधांचा उपयोग करून घेऊ इच्छिणाऱ्या अशा कोणत्याही व्यक्तीचे असे सर्व अभिलेख सहज उपलब्ध असतील, ज्याचे, अशा संस्थेला वित्तीय वा इतर सहाय्य देण्यासंबंधात अथवा कर्ज घेणाऱ्या संस्थेकडून अशा व्यक्तीला देण्यात आलेले कोणतेही कर्ज वा अग्रिम यांची पुनर्वित्त व्यवस्था करण्यासंबंधात अवलोकन करणे, लघु उद्योग बँकेला आवश्यक वाटेल.

(२) लघु उद्योग बँकेला पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या कोणत्याही संस्थेला वा व्यक्तीला त्या पोटकलमात निर्देशिलेल्या कोणत्याही अभिलेखाच्या प्रती तिच्याकडे सादर करणे आवश्यक करता येईल आणि संस्था, किंवा प्रकरणपरत्वे, व्यक्ती, अशा मागणीचे अनुपालन करण्यास बांधील असेल.

**कर्ज किंवा अग्रिम यांची विधिग्राह्यता प्रश्नास्पद केली जाणार नाही.**

**४३.** त्यावेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये एतद्विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरीही, या अधिनियमाच्या उपबंधानुसार लघु उद्योग बँकेकडून देण्यात आलेले कोणतेही कर्ज वा अग्रिम यांची विधिग्राह्यता उपरोक्त अशा अन्य कोणत्याही कायद्याच्या किंवा कोणताही ठराव, संविदा, ज्ञापन, अधिसंघ नियमावली किंवा अन्य संलेख यांच्या आवश्यकतांचे अनुपालन न केल्याच्या कारणावरून प्रश्नास्पद केली जाणार नाही :

परंतु, जेव्हा एखादी कंपनी वा सहकारी संस्था यांना, तिच्या ज्ञापनाद्वारे कर्जे वा अग्रिमे मिळविण्याची शक्ती प्रदान करण्यात आली नसेल अशा बाबतीत, अशा कंपनीने वा संस्थेने मिळवलेले कोणतेही कर्ज वा अग्रिम विधिग्राह्य ठरणार नाही.

**संचालकाचे हानिरक्षण.**

**४४.** (१) प्रत्येक संचालकाची, तो आपले कर्तव्य पालन करीत असताना वा त्याच्या कर्तव्य पालनाच्या संबंधात, त्याच्या बुद्धिपुरस्सर हयगयीमुळे वा कसुरीमुळे घडली असेल ती हानी खेरीज करून, अन्यथा झालेली सर्व हानी व त्याने केलेला खर्च यांचे लघु उद्योग बँकेकडून हानिरक्षण केले जाईल ;

(२) संचालक, लघु उद्योग बँकेच्या अन्य कोणत्याही संचालकासाठी किंवा अन्य अधिकारी वा इतर कर्मचारी यांच्यासाठी अथवा लघु उद्योग बँकेच्या वतीने संपादित केलेली वा घेतलेली कोणतीही संपत्ती वा प्रतिभूती यांच्या मूल्याच्या किंवा त्यावरील हक्काच्या अपुरेपणातून वा वैगुण्यातून अथवा लघु उद्योग बँकेच्या आबंधनाधीन असलेल्या कोणत्याही ऋणकोच्या वा व्यक्तीच्या नादारीतून वा गैरकृत्यातून अथवा त्याच्या पदाची किंवा त्यासंबंधातील कर्तव्ये पार पाडताना सद्भावपूर्वक केलेल्या कोणत्याही कृतीमधून उद्भवलेली कोणतीही हानी वा खर्च, यासाठी जबाबदार असणार नाही.

**या अधिनियमान्वये केलेल्या कार्यवाहीचे संरक्षण.**

**४५.** या अधिनियमानुसार वा कायद्याचा प्रभाव असणारा अन्य कोणताही कायदा किंवा उपबंध यानुसार सद्भावपूर्वक केलेल्या वा करणे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही कृतीमुळे झालेली किंवा होण्याची शक्यता असलेली कोणतीही हानी वा नुकसान यांसाठी, लघु उद्योग बँक, अशा बँकेचा अध्यक्ष, किंवा कोणताही संचालक वा कोणताही अधिकारी वा अन्य कर्मचारी अथवा या अधिनियमाखालील कार्य पार पाडण्यासाठी त्या बँकेकडून प्राधिकृत करण्यात आलेली कोणतीही व्यक्ती, यांच्याविरुद्ध कोणताही दावा वा अन्य वैध कार्यवाही दाखल करता येणार नाही.

**ठेवीदार किंवा बंधपत्रधारक वा अन्य प्रतिभूतीधारक यांच्याकडून नामनिर्देशन.**

**४६.** (१) अन्य कोणत्याही विधीमध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, लघु उद्योग बँकेकडे ठेवलेल्या किंवा तिच्याकडून काढण्यात आलेल्या कोणत्याही ठेवी, बंधपत्रे किंवा इतर प्रतिभूती यांच्यासंबंधात विहित रीतीने नामनिर्देशन करण्यात आले असेल अशा बाबतीत अशा ठेवी, बंधपत्रे वा इतर प्रतिभूती यांवरील देय रक्कम, ठेवीदाराचा किंवा त्याच्या धारकाचा मृत्यू झाल्यावर अशा ठेवी, बंधपत्रे किंवा इतर प्रतिभूती या संबंधातील अन्य कोणत्याही व्यक्तीचा अधिकार, हितसंबंध वा हक्क-मागणी यांच्या अधीनतेने, नामनिर्देशितीकडे निहित होतील आणि तिला प्रदेय होतील.

(२) पोटकलम (१) ज्या उपबंधानुसार लघु उद्योग बँकेकडून करण्यात येणारे कोणतेही प्रदान हे अशा ठेवी, बंधपत्रे या प्रतिभूती वा संबंधातील तिची दायित्वे पूर्णपणे चुकते करणारे असेल.

संचालकांच्या नियुक्ती संबंधातील लघु उद्योग बँकेची व्यवस्था प्रचलित राहणे.

**४७.** (१) लघु उद्योग क्षेत्रांतील औद्योगिक संस्थेशी लघु उद्योग बँकेकडून करण्यात आलेल्या व्यवस्थेद्वारे, लघु उद्योग बँकेकडून अशा औद्योगिक संस्थेच्या एका किंवा अधिक संचालकांची नियुक्ती करण्याबाबत तरतूद करण्यात येते तेव्हा, असा उपबंध आणि त्यानुसार करण्यात आलेली संचालकांची नियुक्ती ही, कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) यात किंवा त्या काळापुरता अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यात किंवा औद्योगिक संस्थेशी संबंधित ज्ञापन, अधिसंघ नियमावली वा अन्य कोणताही संलेख यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, विधिग्राह्य व परिणामक असेल आणि शेअर्सविषयक अर्हता, वयोमर्यादा, संचालकांच्या पदांची संख्या, संचालकांच्या पदावरून काढून टाकणे आणि पूर्वोक्तानुसार अशा अन्य कायद्यात वा संलेखात अंतर्भूत असलेल्या तत्सम शर्ती या संबंधातील कोणताही उपबंध, उपरोक्त व्यवस्थेनुसार लघु उद्योग बँकेकडून नियुक्त करण्यात आलेल्या कोणत्याही संचालकाला लागू होणार नाही.

(२) पूर्वोक्तानुसार नियुक्त करण्यात आलेला कोणताही संचालक,—

(क्) लघु उद्योग बँकेची मर्जी असेपर्यंत पद धारण करील आणि लघु उद्योग बँकेच्या लेखी आदेशानुसार त्याला पदावरून दूर करता येईल किंवा त्याऐवजी कोणत्याही व्यक्तीची नियुक्ती करता येईल ;

(ख्) केवळ तो संचालक आहे या कारणावरून अथवा संचालक या नात्याने आपले कर्तव्य पार पाडताना सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे वगळलेल्या कोणत्याही कृतीसाठी किंवा त्या संबंधातील कोणत्याही गोष्टीबद्दल कोणतेही आबंधन किंवा दायित्व ओढवून घेणार नाही ;

(ग्) आवर्तनाद्वारे सेवानिवृत्तीस पात्र होणार नाही आणि अशा सेवानिवृत्तीस पात्र होणाऱ्या संचालकांची संख्या मोजताना त्याला हिशेबात घेतले जाणार नाही.

लघु उद्योग बँकेच्या संबंधात १८९१ चा अधिनियम १८ लागू होणे.

**४८.** बँककार वही पुराना अधिनियम, १८९१ हा, लघु उद्योग बँकेला संबंधात, ती बँक जणू काही त्या अधिनियमाच्या कलम २ मध्ये व्याख्या केलेली बँक असल्याप्रमाणे लागू होईल.

१९४९ चा अधिनियम १० लघु उद्योग बँकेला लागू होणार नाही.

**४९.** बँक व्यवसाय विनियमन अधिनियम, १९४९ मध्ये अंतर्भूत असलेली कलम ३४क आणि ३६कघ खेरीज करून, अन्य कोणतीही गोष्ट लघु उद्योग बँकेला लागू होणार नाही.

१९६१ चा अधिनियम ४३ लघु उद्योग बँकेला लागू होणार नाही.

**५०.** आयकर अधिनियम, १९६१ किंवा त्या काळापुरती अंमलात असलेली, आयकर किंवा उत्पन्न, नफा वा लाभ, यावरील अन्य कोणताही कर या संबंधातील कोणतीही अधिनियमिती, यामध्ये एतद्‌विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरीही, लघु उद्योग बँक—

(क्) लघु उद्योग विकास सहाय्य निधीला उपार्जित होणारे किंवा त्याला प्राप्त होणारे कोणतेही उत्पन्न, नफा वा लाभ अथवा त्या निधींकडे आलेली कोणतीही रक्कम, आणि

(ख्) लघु उद्योग बँकेने प्राप्त केलेले कोणतेही उत्पन्न, नफा वा लाभ अथवा तिला मिळालेली कोणतीही रक्कम,

या संबंधात कोणताही आयकर वा अन्य कोणताही कर भरण्यास दायी असणार नाही.

लघु उद्योग बँकेचे समापन.

**५१.** कंपन्यांच्या या निगमांच्या परिसमापनासंबंधीच्या कायद्याचा कोणताही उपबंध, लघु उद्योग बँकेला लागू होणार नाही आणि केंद्र शासनाच्या आदेशाखेरीज आणि ते निदेशित करील अशा रीतीखेरीज त्या बँकेचे समापन केले जाणार नाही.

विनियम करण्याची शक्ती.

**५२.** (१) मंडळाला विकास बँकेला पूर्वमान्यतेने, अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाचे उपबंध परिणामक करण्याच्या प्रयोजनार्थ, ज्यासाठी उपबंध आवश्यक व उचित असतील अशा सर्व बाबींसाठी, या अधिनियमाच्या उपबंधाशी विसंगत नसतील असे विनियम करता येतील.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी शक्तीच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, अशा विनियमाद्वारे,—

(क्) मंडळाच्या बैठकीच्या वेळा व ठिकाणे आणि कामकाज चालनासाठी आवश्यक गणपूर्तीसह अशा बैठकीसाठी कलम ११ च्या पोटकलम (१) अन्वये अनुसरावयाची कार्यपद्धती ;

(ख्) लघु उद्योग विकास सहाय्य निधीचे, कलम २५ च्या पोटकलम (१) अन्वये आणि लघु उद्योग बँकेचे, कलम २८ च्या पोटकलम (१) अन्वये ताळेबंद व लेखे तयार करावयाचा नमुना व रीत ;

(ग्) कलम ४६ च्या पोटकलम (१) नुसार नामनिर्देशने करण्याची रीत ;

(घ) सर्वसाधारण लघु उद्योग बँकेचे कार्यक्षम चालन ;

(ङ) विहित करावयाची किंवा करता येईल अशी अन्य कोणतीही बाब ;

— यासाठी उपबंध करता येतील.

(३) या कलमाखालील केलेला प्रत्येक विनियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ते सत्रासीन असताना एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता ठेवला जाईल, आणि पूर्वोक्त सत्रांच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या विनियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो विनियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो विनियम अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही. तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शुन्यीकरणामुळे, तत्पूर्वी या विनियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

विवक्षित अधिनियमितीचे विशोधन.

**५३.** या अधिनियमाच्या दुसऱ्या अनुसूचीच्या भाग एक, दोन, तीन व चार मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या अधिनियमिती यांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या रीतीने विशोधित करण्यात येतील आणि अशी विशोधने लघु उद्योग बँकेच्या स्थापनेच्या दिनांकी परिणामक होतील.

अडचणी दूर करण्याची शक्ती.

**५४.** या अधिनियमाचे उपबंध परिणामक करतेवेळी कोणतीही अडचण उद्भवल्यास, केंद्र शासनाला, विकास बँकेशी विचारविनिमय करून आदेशाद्वारे, अडचण दूर करण्याच्या प्रयोजनार्थ, अशा प्रयोजनांशी विसंगत नसेल अशी कोणतीही गोष्ट करता येईल :

परंतु, या अधिनियमात राष्ट्रपतींची अनुमती मिळाल्याच्या दिनांकापासून तीन वर्षांचा कालावधी संपल्यानंतर असा कोणताही आदेश दिला जाणार नाही.

## पहिली अनुसूची

[पहा कलम ३६ (३)]

### एकनिष्ठता व गुप्तता यांची घोषणा

मी ............................................................ याद्वारे जाहीर करतो की, मी, भारतीय लघु उद्योग बँकेचा संचालक, ............................................................ समितीचा सदस्य, लेखापरीक्षक, अधिकारी किंवा प्रकरणपरत्वे, इतर कर्मचारी या नात्याने माझ्याकडून अपेक्षित असलेली आणि उक्त बँकेतील किंवा बँकेच्या संबंधातील, मी धारण केलेले पद वा स्थान यांच्याशी संबंधित कर्तव्ये मी निष्ठेने, रास्तपणाने आणि माझे संपूर्ण कौशल्य व क्षमता वापरून पार पाडीन व त्यांचे पालन करीन.

मी आणखी असे जाहीर करतो की, मी, भारतीय लघु उद्योग बँकेचे व्यवहार वा उक्त बँकेशी कोणताही व्यवहार करणाऱ्या व्यक्तीचे व्यवहार यांच्याशी संबंधित कोणतीही माहिती, त्या संबंधात विधितः हक्कदार नसलेल्या कोणत्याही व्यक्तीला कळविणार नाही वा कळविली जाऊ देणार नाही, तसेच उक्त बँकेच्या व्यवसायाशी संबंधित किंवा उक्त बँकेशी व्यवहार करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या व्यवसायाशी संबंधित उक्त बँकेच्या मालकीच्या वा कब्जात असलेल्या कोणत्याही वह्या किंवा दस्तऐवज अशा कोणत्याही व्यक्तीला तपासणीसाठी देणार नाही किंवा त्या तिला उपलब्ध होऊ देणार नाही.

माझ्या समक्ष सही केली.

(सही)

## दुसरी अनुसूची

**(कलम ५३ पहावे.)**

(विवक्षित अधिनियमितिचे विशोधन)

भाग एक

**भारतीय रिझर्व बँक अधिनियम, १९३४ ची विशोधने.**

**(१९३४ चा अधिनियम क्रमांक २)**

१. कलम २ मध्ये, खंड (ङ्) नंतर पुढील खंड समाविष्ट करावा, तो असा—

" (ङ्ठ्) " लघु उद्योग बँक " याचा अर्थ, भारतीय लघु उद्योग विकास बँक अधिनियम, १९८९ " च्या कलम ३ अन्वये स्थापन केलेली भारतीय लघु उद्योग विकास बँक, असा आहे. "

२. कलम १७ मध्ये,—

(क्) खंड (४ छ्) मध्ये, " पुनर्रचना बँक " या शब्दानंतर " किंवा लघु उद्योग बँक " हे शब्द समाविष्ट करावेत ;

(ख्) खंड (४ ज्) मध्ये, " विकास बँक " या शब्दानंतर " किंवा लघु उद्योग बँक " हे शब्द समाविष्ट करावेत ;

(ग्) खंड (४ झ्) मध्ये, " किंवा पुनर्रचना बँक " या शब्दाऐवजी " पुनर्रचना बँक किंवा लघु उद्योग बँक " हे शब्द दाखल करावेत ;

(घ्) खंड (१२ ख्) मध्ये, " पुनर्रचना बँक " या शब्दाऐवजी, " पुनर्रचना बँक किंवा लघु उद्योग बँक " हे शब्द दाखल करावेत.

३. कलम ४२ मधील, पोटकलम (१) च्या स्पष्टीकरणाच्या खंड (ग्) च्या उपखंड (दोन) मध्ये, " किंवा राष्ट्रीय बँकेतून " या शब्दानंतर " किंवा लघु उद्योग बँकेतून " हे शब्द समाविष्ट करावेत.

४. कलम ४६ ग मधील पोटकलम (२) मध्ये, खंड (ग्) व (घ्) मध्ये " किंवा पुनर्रचना बँक " हे शब्द जेथे जेथे आढळून येतील तेथे तेथे त्या शब्दानंतर " किंवा लघु उद्योग बँक " हे शब्द समाविष्ट करवेत.

भाग दोन

**औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ चे विशोधने.**

**(१९४७ चा अधिनियम क्रमांक १४)**

कलम २ मधील, खंड (खख्) मध्ये, " भारतीय औद्योगिक विकास बँक " या शब्दानंतर, " भारतीय लघु उद्योग विकास बँक अधिनियम, १९८९ च्या कलम ३ अन्वये स्थापन केलेली भारतीय लघु उद्योग विकास बँक " हे शब्द समाविष्ट करावेत.

भाग तीन

**बँक व्यवसायाचे नियमन अधिनियम, १९४९ याची विशोधने.**

**(१९४९ चा अधिनियम क्रमांक १०)**

१. कलम ५ मध्ये, खंड (ढ्) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (ढझ्) " लघु उद्योग बँक " याचा अर्थ, भारतीय लघु उद्योग विकास बँक अधिनियम, १९८९ याच्या कलम ३ अन्वये स्थापन केलेली भारतीय लघु उद्योग विकास बँक , असा आहे ;"

२. कलम १८ मधील, पोटकलम (१) मध्ये, स्पष्टीकरणात, खंड (क्) मधील उपखंड (दोन) मध्ये " किंवा राष्ट्रीय बँकेतून " या शब्दानंतर, " किंवा लघु उद्योग बँकेतून " हे शब्द समाविष्ट करावेत.

३. कलम ३४ क मधील, पोटकलम (३) मध्ये, " राष्ट्रीय बँक " या शब्दानंतर, " लघु उद्योग बँक " हे शब्द समाविष्ट करावेत.

४. कलम ३६ क घ मधील, पोटकलम (३) मध्ये, " राष्ट्रीय बँक " या शब्दानंतर " लघु उद्योग बँक ", हे शब्द समाविष्ट करावेत.

५. कलम ५६ मधील, खंड (ज्) खाली स्पष्टीकरणाच्या खंड (क्) च्या उप खंड (दोन) मध्ये, "राष्ट्रीय बँक" या शब्दानंतर, "लघु उद्योग बँक" हे शब्द समाविष्ट करावेत.

भाग चार

**बोनस प्रदान अधिनियम, १९६५ चे विशोधन**

**(१९६५ चा अधिनियम क्रमांक २१)**

कलम ३२ मधील, खंड (नऊ) मध्ये, उपखंड (च्) नंतर पुढील उपखंड समाविष्ट करण्यात येईल, तो असा :—

"(चक्) भारतीय लघु उद्योग विकास बँक अधिनियमाच्या कलम ३ अन्वये स्थापन केलेली भारतीय लघु उद्योग विकास बँक";